# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ मार्च, २०१७ / फाल्गुन १८, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८४**

---

**राज्यात बोगस पॅथॉलॉजी प्रयोगशाळा सुरु करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१) * २६८९३ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.आनंदराव पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्रीमती स्मिता वाघ, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १९६१८ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाच हजारांच्यावर बोगस पॅथॉलॉजी प्रयोगशाळा सुरु असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात बोगस पॅथॉलॉजिस्टची संख्या दिवसेंदिवस वाढत असून काही ठिकाणी पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांऐवजी साधे टेक्निशियन्स पॅथॉलॉजी प्रयोगशाळा चालवित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या सर्वेक्षणामधून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बोगस पॅथॉलॉजी प्रयोगशाळामधील अहवालामुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याने उक्त पॅथॉलॉजिस्टची शासनाने चौकशी करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दापचरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील दुध प्रकल्पासाठी अधिग्रहीत केलेल्या आदिवासींच्या घरांना घरपट्टी आकारण्याबाबत**

**(२) * २७७२४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापचरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील दुध प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या विस्थापित दापचरी नविन युनिट पाडा येथील २५० घरांना दापचरी ग्रामपंचायत गेली सहा वर्षे घरपट्टी आकारत नसल्यामुळे विस्थापित आदिवासींना शासनाच्या योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या योजनांचा लाभ प्राप्त होण्याकरीता विस्थापित आदिवासींनी गट विकास अधिकारी, डहाणु पंचायत समिती यांच्याकडे घरपट्टी आकारण्याची मागणी केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) पालघर जिल्हयातील डहाणू तालुक्यामधील दापचरी ग्रामपंचायतीने दापचरी दुध प्रकल्पातील नविन युनिट पाडा येथील घरांना घरपट्टीची आकारणी करण्याबाबत मासिक सभेचा ठराव केला आहे. तेथील अनुसूचित जमातीच्या ७० लाभार्थ्यांना शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालय व अनुसूचित जमातीच्या १६ लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुल योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत.

-----------------

### पंचायत समिती मारेगाव (जि.यवतमाळ) येथील कृषी अधिकाऱ्यांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरीच्या मंजुरीकरिता पैशाची मागणी केल्याबाबत

**(३) * २७४६६ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती मारेगाव (जि.यवतमाळ) येथील कृषी अधिकारी यांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरीच्या मंजुरीकरिता शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणामध्ये वरिष्ठांच्या आदेशावरून चौकशी समिती गठीत करण्यात आली होती, त्यामध्ये कृषी अधिकारी यांना दोषी ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कृषी अधिकाऱ्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून संरक्षण देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ व सहाय्यक गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांची संयुक्त चौकशी समिती नेमून सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली. त्यानुसार दोषींवर दिनांक ३१/१२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये त्यांना सक्त ताकीद देण्यात येऊन त्याची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आली आहे. तथापि सदर चौकशी परिपूर्ण वाटत नसल्याने

प्रस्तुत प्रकरणी दोषी आढळलेल्या ३ अधिका-यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्यामार्फत पुन्हा सखोल चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत शासन स्तरावरुन आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे कृषि अधिका-यास वरिष्ठ अधिका-यांकडून संरक्षण देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) * २६९८२ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाकरिता वॉर्डबॉयची २०७ पदे मंजूर असून यापैकी ७६ पदे रिक्त आहेत तसेच मानसोपचार तज्ञांची एकूण ०९ पदे व फिजिशियनचे एक पद रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे. एकूण ३७५ मंजूर पदांपैकी २६७ पदे भरलेली असून १०८ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालयात फिजीशियन व वॉर्डबॉयची पदे मंजूर नाहीत. तथापी स्त्री/पुरुष परिचरांच्या २०७ मंजूर पदांपैकी १३१ पदे भरलेली असून ७६ पदे रिक्त आहेत, तसेच मानसोपचार तज्ञांची एकूण ९ पदे रिक्त आहेत.

(३) प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील वर्ग १ व वर्ग २ ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू असून, गट क व ड ची पदे भरण्याकरिता जानेवारी, २०१७ मध्ये लेखी परिक्षा घेण्यात आल्या आहेत.निकाल जाहीर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच स्त्री/पुरुष परिचरांची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सीना नदीवर (ता.करमाळा, जि.सोलापूर) संगोबा येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा कोरडा पडल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत**

**(५) * २८६२५ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीना नदीवर (ता.करमाळा, जि.सोलापूर) संगोबा येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यात पाटबंधारे विभागाने वेळेत पाणी अडविले नसल्याने सदर बंधारा कोरडा पडल्याने शेतक-यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन वेळेत बंधाऱ्यात पाणी न अडविणाऱ्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

संगोबा को.प.बंधा-यामध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यासाठी ४.५० मीटर उंचीचे दरवाजे (निडल) बसविण्यात आले होते. परंतू सीना नदीला दिनांक ०२/१०/२०१६ रोजी अचानक आलेल्या पूराचा विचार करून को.प.बंधा-याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बसविलेले बर्गे काढण्यात आले होते. पूर ओसरल्यानंतर बंधाऱ्यामध्ये दरवाजे बसविण्यात आले होते. मात्र नदीचा प्रवाह कमी झाल्याने संगोबा को.प.बंधा-यामध्ये २४.६० दलघफू (२७%) पाणीसाठा झाला. उपलब्ध पाणीसाठा रब्बी हंगामात सिंचनासाठी वापरण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांसाठीचा मंजूर निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबत**

**(६) * २६७५० श्री.नारायण राणे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांसाठी रुपये ११ कोटी जिल्हा नियोजन विभागाकडून जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला मंजूर करण्यात आलेले असूनही हा निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रस्ते दुरुस्ती व नुतनीकरणासाठी उक्त मंजूर निधी त्वरीत जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशतः खरे आहे. जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-१७ अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण या योजनेकरीता रुपये १० कोटी इतकी तरतूद मंजूर असून त्यापैकी रु. २.०० कोटी इतका निधी स्पीलमधील कामांकरीता वर्ग करण्यात आला आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडून प्राप्त माहितीनुसार जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निश्चित झाल्यानुसार सन २०१६-१७ मधील मंजूर तरतूदीपैकी उर्वरित अवितरीत निधीकरीता कामांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर केला असून प्रस्तावास अंतिम मान्यता देऊन निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे मूत्रपिंड विशेषतज्ञांची नेमणूक करण्याबाबत**

**(७)** * **२६८६४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या माध्यमातून सहा महिन्यापूर्वी डायलेसिस सेंटर सुरु करण्यांत आले, परंतु या केंद्रात मूत्रपिंड विशेषज्ञांची नेमणूक केली नसल्यामुळे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत येणारे रुग्ण सदर सोयीपासून वंचित राहत असून त्यांना बाहेरुन डायलेसिस करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची गैरसोय लक्षांत घेता तातडीने मूत्रपिंड विशेषतज्ञांची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) (२) व (३) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (पब्लिक प्रायवेट पार्टनरशिप) डायलेसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. सदर केंद्रात जर्मन रिनल केअर तर्फे मुत्रपिंडतज्ञाची नेमणूक करण्यात आली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सदर आजारांतर्गत अद्याप कोणत्याही रुग्णाची नोंद करण्यात आली नाही.

-----------------

**भीमा नदीकाठी (ता.शिरुर, जि.पुणे) असलेल्या ऐतिहासिक विजयस्तंभाचा विकास करुन पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत**

**(८) * २६८२७ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा नदीकाठी (ता.शिरुर, जि.पुणे) असलेल्या ऐतिहासिक विजयस्तंभा शेजारील अतिक्रमण दूर करुन या वास्तूला विकास पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत स्थानिकांनी सातत्याने प्रशासनाकडे मागणी केली असूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर ऐतिहासिक विजयस्तंभाशेजारी अतिक्रमण करणाऱ्यांवर व या वास्तूंस पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) भीमा कोरेगाव ऐतिहासिक विजयस्तंभाला २००४ मध्येच "क" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे सदर स्थळाला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत प्रशासन दुर्लक्ष करीत आहे अशी बाब नाही.

(२), (३) व (४) सदर ठिकाणी असलेले अतिक्रमण दूर करण्याच्या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

**मौजे मिळकतखार-मळा (ता.अलिबाग, जि.रायगड)**
**ग्रामीण जोड रस्त्याच्या दुरूस्तीबाबत**

**(९) * २८०९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मिळकतखार-मळा (ता.अलिबाग, जि.रायगड) या ग्रामीण जोड रस्ता क्र.२६१ सन २००३ पासून दुरूस्त करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण जोड रस्ता तयार करण्यासाठी मिळकतखार येथील ग्रामस्थांनी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जोड रस्ता तयार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्नांकित मिळकतखार-मळा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २६१ असून त्याची एकूण लांबी १.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याचे काम सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याबाबत**

**(१०) * २६८११ डॉ.अपूर्व हिरे, श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १९३५६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य जल परिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या बैठकीत सिंचनविषयक विविध कायद्यांतील सुधारणा व नियम करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी टास्क फोर्सची नियुक्ती करावी, गोदावरी खोऱ्यांचे एकात्मिक जल आराखडा राज्य जल मंडळाला सादर करुन उर्वरित खोऱ्याचे जल आराखडे कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करावे असा निर्णय शासनाने घेऊनही उक्त निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याच्या दृष्टीने दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णय क्रमांक मजनिप्रा-२०१५/३९१/प्र.क्र.९३/२०१५ जसं(आस्था) अन्वये तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी तज्ज्ञ समितीच्या दिनांक २७ मे, २०१६, १६ जुलै, २०१६ व ६ ऑगस्ट, २०१६ रोजी बैठका झाल्यात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहु तज्ज्ञ समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यानुषंगाने त्यावर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) नाही,

समितीचा अहवाल मार्च, २०१७ पर्यंत शासनास प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही प्राधान्याने करणेत येईल.

-----------------

**मुंबईच्या जी.टी. रुग्णालयात जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(११) * २७६८९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील गुरुदास तेजपाल (जी.टी.रुग्णालय) या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिका-यांची बनावट स्वाक्षरी करुन जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सुमारे ३१ लाख रुपये बनावट धनादेश बँक खात्यातून परस्पर वटवून या रकमेची अफरातफर केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ धनादेश सदर रुग्णालयामार्फत वटविले गेले नसतानाही बनावट धनादेशाद्वारे ही रक्कम विटा (जि.सांगली) या शहरातील देना बँक आणि बँक ऑफ इंडियामधील खातेदाराचे खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत मिळालेल्या रक्कमेमध्ये मुंबईच्या सेंट जॉर्ज रूग्णालयामधील कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी माता रमाबाई आंबेडकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, या गैरव्यवहारात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसोबत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याच्या तक्रारी रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी केल्या, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तसेच राज्यात इतर ठिकाणी अशा प्रकारचे अनुदानातील गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदरहू प्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ०३/२०१७ कलम ४२० भा.दं.वि. कलम अन्वये नोंद करण्यात आली आहे व पुढील तपास सुरु आहे.

(५) जी.टी. रुग्णालय मधील बनावट स्वाक्षरी प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२५/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, अन्वये अनोळखी व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतचे प्रकरण तपासाधिन आहे. तसेच, राज्यात इतर ठिकाणी अनुदानातील गैरव्यवहाराबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, अशा घटना घडू नये याकरिता संबंधितांना सूचना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्रम्हपूरी वन विभागातील (जि.चंद्रपूर) शिवणी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या मोहाळी येथील महिला वाघाच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(१२) * २९४१९ श्री.हेमंत टकले, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी वन विभागातील (जि.चंद्रपूर) शिवणी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या मोहाळी येथे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी सकाळच्या सुमारास श्रीमती मंदाबाई मोतिराम दांडेकर ही महिला प्रात:विधीसाठी गावाशेजारील शेतात गेली असता वाघाने हल्ला करुन तिला ठार केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवणी वनपरिक्षेत्रात (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथे सरपण गोळा करण्यासाठी गेलेल्या महिलेवर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार वन विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) उपरोक्त घटनांच्या अनुषंगाने परिसरात लावण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपद्वारे प्राप्त छायाचित्रांचे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या समक्ष विश्लेषण करुन मानवी जिवीतास हानीकारक ठरलेल्या वाघाला जेरबंद करण्यात आले आहे.

वाघाच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या व्यक्तिंच्या कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**अयप्पा डोंगर, श्रीनगर (ठाणे) येथील पायवाटा व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१३) * २९१३६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अयप्पा डोंगर, श्रीनगर (ठाणे) येथे पर्यटकांसाठी बांधण्यात आलेल्या पायवाटा व रस्त्याची दुरवस्था झाल्याने वारंवार अपघात होऊन पर्यटक जखमी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार अपघात होऊन नागरिक जखमी होत असल्याने वन विभागाच्या हद्दीतील पायवाटा व रस्ते दुरुस्ती करण्याकरिता लोकप्रतिनिधीनी निवेदनाद्वारे मा.वने मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर जीवित हानी टाळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर वनक्षेत्राच्या हद्दीवर अयप्पा मंदिर आहे. अयप्पा डोंगर, श्रीनगर (ठाणे) येथे पर्यटकांसाठी बांधण्यात आलेल्या पायवाटा व रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघात होऊन पर्यटक जखमी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंत्रालयात ग्राम संपूर्ण परिवर्तन मिशन योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

**(१४) * २७९४१ ॲड.अनिल परब, श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री यांनी उद्योगपती रतन टाटा, अभिताभ बच्चन आणि काही नामवंत उद्योगपतीच्या उपस्थितीत मंत्रालयात ग्राम संपूर्ण परिवर्तन मिशनच्या माध्यमातून गावांच्या विकासाच्या योजनेची घोषणा माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये करुनही याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच एक हजार गावांच्या योजनेकरिता राज्य मिशन कौन्सिलची स्थापना करण्यात आलेली नाही, तसेच या योजनेसाठी ५० टक्के निधी देणार असे जाहीर करण्यात आले असून यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही. सदर अभियान राज्यात राबविण्यासाठी Governing Council गठीत करण्यात आली असून या Governing Council च्या बैठका व कामकाज सुरु झाले आहे. अभियानांतर्गत जिल्हा अभियान परिषदेची दिनांक २९/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आलेली आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये राज्य शासनाचा सहभाग मुख्यत: राज्य शासनाच्या विविध योजनांचा कृतीसंगम (Convergence) करण्याबाबतचा असून त्या अनुषंगाने या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त निधीची आवश्यकता भासल्यास प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये एबी पॉझीटीव्ह रक्त गटामुळे हृदय शस्त्रक्रिया लांबणीवर पडल्याबाबत

**(१५) * २८७०५ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये एका ६ वर्षीय मुलीचा रक्तगट एबी पॉझीटीव्ह असल्यामुळे तीची हदय शस्त्रक्रिया गेल्या १९ दिवसापासून झालेली नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्तगटाबाबतची माहिती रक्तपेढी विभाग प्रमुखाला न देता यात संबंधित डॉक्टराने निष्काळजीपणा केला असल्याचा आक्षेप किंग कोब्रा आर्गनायझेशन युथ फोर्सचे अध्यक्षांनी केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१), (२) व (३) अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे विदर्भ प्रादेशिक विभाग तसेच लगतच्या मध्यप्रदेश राज्यातून रुग्ण उपचारार्थ येतात. त्यामुळे रुग्णांवरील उपचाराची तातडी विचारात घेऊन शस्त्रक्रियेचा दिनांक व वेळ निश्चित करण्यात येते. प्रश्नात नमूद रुग्णाच्या विविध आरोग्यविषयक चाचण्या, बधिरिकरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच आवश्यक रक्ताची तरतूद करुन यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी संस्थास्तरावर त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या चौकशीत या प्रकरणी कोणताही निष्काळजीपणा झाला नसल्याचे दिसून आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पुण्यातील टेमघर धरणाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१६) * २७०६८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील टेमघर धरणाला माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गळती लागून सदर धरणाची दुरुस्ती आतापर्यंत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन गळती होवून पाणी वाहून जावू नये म्हणून धरणाची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) धरणातील गळतीबाबत तज्ञ समिती गठीत करणेत आली होती. तज्ञ समितीचे अहवालाचे अनुषंगाने गळती प्रतिबंधक व धरण मजबुतीकरण विषयक कामे हाती घेणेत आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### चिपळूण शहरातील गोवळकोट, अफ्रीन पार्क येथील अलमक्का अपार्टमेंटमध्ये रक्तचंदनाची तस्करी झाल्याबाबत

**(१७) * २६७३३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील गोवळकोट, अफ्रीन पार्क येथील अलमक्का अपार्टमेंटमधील श्री. समीर शौकत दाभोळकर यांच्या गाळयामध्ये रक्तचंदनाचे ९२ नग जप्त करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच चिपळूण येथे वन विभागाने घातलेल्या धाडीत रुपये १० कोटींचा रक्तचंदनाचा साठा जप्त करण्यात आला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चिपळूण शहरातील गोवळकोट येथे तसेच मिरजोली हद्दीत रक्तचंदनाचा १४ टन इतका साठा दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास एका पत्राशेडमध्ये वन विभागाला सापडला असून चिपळूणमधील रक्तचंदनाचा तस्करीचा हा तिसरा छापा असून या छाप्प्यात दीड कोटीचे रक्तचंदन सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्यातून विदेशात रक्तचंदनाची तस्करी होत असून यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

दिनांक ३०/१२/२०१६ रोजी गोवळकोट, अफ्रिन पार्क येथील अलमक्का अपार्टमेंटमधील श्री.समीर शौकत दाभोळकर यांच्या गाळा क्र.२ मध्ये रक्तचंदन नग ९२, घ.मी. १.९४४ (वजन २८५०) अवैधरित्या व विनापरवाना आढळून आला. हा माल जप्त करून वनक्षेत्रपाल, फिरते पथक चिपळूण यांचेकडील प्र.गु.रि.क्र. २५/२०१६ अन्वये आरोपी ईसा जमालुद्दीन हळदे यांचेविरुध्द नोंदविणेत आला आहे.

(२) चिपळून वन विभागाने गोवळकोट परिसरात दिनांक ३०/१२/२०१६ ते दिनांक ७/१/२०१७ या कालावधीत घातलेल्या धाडी मध्ये ४ ठिकाणी १३.९३ टन इतका अवैध रक्तचंदन माल मिळून आला. हा माल जप्त केला आहे. त्याची अंदाजित किंमत रू.१.७१ कोटी आहे.

(३) दिनांक ३१/१२/२०१६ रोजी गोवळकोट रोड मिरजोली हद्दीत एकूण १०४ नग/ २.२६१ घ.मी. वजन ३.१३० टन किंमत रू. ४० लाख इतक्या किंमतीचा अवैध रक्तचंदन माल एका पत्राशेडमध्ये वन विभागाला सापडला असून, हा दुसरा छापा आहे.

(४) सदर गुन्हयात निष्पन्न झालेले आरोपी ईसा जमालुद्दीन हळदे यांनी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे अटकपूर्व जामीन मिळणेसाठी अर्ज क्र. ४/२०१७, दिनांक १०/१/२०१७ रोजी दाखल केलेला अर्ज न्यायालयात दिनांक ८/२/२०१७ रोजी सुनावणी होवून सदर अर्ज फेटाळला आहे. सदर आरोपी अद्याप फरारी आहे. गुन्हयातील दुसरे आरोपी यासीन सलीम मेमन यांनी खेड येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयात क्र. ९/२०१७, दिनांक १९/१/२०१७ अन्वये अटकपूर्व जामीनासाठी केलेल्या अर्जावर दिनांक १७/२/२०१७ रोजी सुनावणीत अंतिम आदेश हावून आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. उक्त

गुन्हयाची चौकशी सुरु आहे. रक्तचंदनाची झाडे ही प्रामुख्याने आंध्रप्रदेशात आढळून येतात. त्याचे संगीत वाद्य बनविणे व वैद्यकीय उपचार कामी महत्व असल्याने विदेशात तस्करी केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**अवयवदान करण्यासाठी जनसामान्यांना प्रोत्साहन देण्याबाबत**

**(१८) * २८९५८ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शरीराचे अवयव दान करण्यासाठी शासनामार्फत नागरिकांना प्रोत्साहित करत असताना मेंदू मृत झालेल्या रूग्णांची नोंद ठेवण्याबाबत आरोग्य विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मेंदू मृत रुग्णांच्या अवयव दानाची परवानगी त्यांच्या नातेवाईकांनी दिल्यानंतर अशा रुग्णांची माहिती रुग्णालयामार्फत शासनास देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
दर महिन्याला मेंदू मृत रुग्णांची माहिती रुग्णालयामार्फत आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना देण्यात येते.

-----------------

**बेंबळा नदीवर (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) उभारलेल्या कालव्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(१९) * २८४५२ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेंबळा नदीवर (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) उभारलेल्या प्रकल्पाच्या कालव्याचे काम अपूर्ण असल्याने हजारो लिटर पाणी वाहून जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कालव्याच्या अपूर्ण कामामुळे वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी कालव्याचे काम पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

कालव्याव्दारे काही लांबीत सिंचन पाझर होऊन नदी/नाल्यात पाणी आढळून येते. तसेच लाभार्थी सद्य:स्थितीत रात्री सिंचन करत नसल्यामुळे रात्रीचा बहुतांश विसर्ग हा नदी/नाल्यामधून वाहून जातो. तथापि नदीनाल्यावरून शेतकरी उपसा सिंचन करुन या पाण्याचा उपयोग करत आहेत.

(२) व (३) मुख्य कालव्याची अपूर्ण कामे मे, २०१७ पर्यंत पूर्ण करण्यात येत असून वितरण प्रणालीची अपूर्ण कामे जून, २०१८ पर्यंत व उर्वरीत भाग १ ची कामे जून, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**पनवेल (जि. रायगड) परिसरात बोगस डॉक्टर व्यवसाय करीत असल्याबाबत**

**(२०) * २६७२१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल, देवीचा पाडा, तळोजा एमआयडीसी (जि.रायगड) या भागात अनेक बोगस डॉक्टर बनावट पदवीच्या आधारे व्यवसाय करीत असल्याची लेखी तक्रार स्थानिक नागरिकांनी पंचायत समिती पनवेल यांच्याकडे केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील काही परिसर महापालिका क्षेत्रात येत असल्याने त्यांच्यावर कारवाई होत नाही, तसेच ग्रामपंचायत व महापालिकेच्या हद्दीच्या वादात सामान्य नागरिकांना बोगस डॉक्टरांकडून उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांनी वारंवार लेखी तक्रारी करुनही आरोग्य प्रशासन व संबंधित अधिकारी या बोगस डॉक्टरांच्या दबावास बळी पडत असल्याने सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) माहे डिसेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात देवीचा पाडा, तोंडरे व पेंधर येथील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांची तोंडी तक्रार तालुका आरोग्य अधिकारी पनवेल यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.
(२) हे खरे नाही,

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी पनवेल यांनी चौकशी करुन श्री.बाबुलाल पटेल, श्री.मिहीर मोंडल, श्री.मनोज बिस्वास, श्री.राजकुमार गौंड, श्री.रामबिलास यादव यांची कागदपत्रे/प्रमाणपत्रे दिनांक १५/१२/२०१६ रोजी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन यांचेकडे तपासणीकरीता पाठविली. दिनांक ०७/०१/२०१७ रोजी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन यांनी वरील ५ व्यक्तींच्या अर्हता मान्यताप्राप्त नसल्याचे तालुका आरोग्य अधिकारी पनवेल यांना कळविले.

देवीचा पाडा, तोंडरे व पेंधर ही गावे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येत असल्याने तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना दिनांक १८/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये या बोगस डॉक्टरांविरुध्द कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

(३) त्याअनुषंगाने महानगरपालिका स्तरावरची बोगस डॉक्टर यांच्यावर कारवाई करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीद्वारे दिनांक २२/०२/२०१७ रोजी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालाच्या आधारावरुन तळोजा पोलीस स्टेशन येथे या बोगस डॉक्टरांवर गुन्हा क्र.३१/२०१७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी मंजूर निधी निळवंडे प्रकल्पासाठी वळती करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२१) * २६९११ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९३२७ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी मंजूर असलेला रुपये ५१ कोटीचा निधी निळवंडे प्रकल्पासाठी वळती करण्याकरिता मुख्य अभियंता, जलसंपदा विभागाने शासनास प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पातील मांजरपाडा प्रकल्प तसेच पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव कालव्याचे बंद पडलेले काम सुरु करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन या प्रकल्पाचा मंजूर निधी इतर प्रकल्पास वळती करु नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव नियोजन विभागात तपासणीत आहे. या प्रकल्पाचा निधी अन्यत्र वळविण्याचा सध्या कोणताही प्रस्ताव नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडयातील सिंचन विहिर वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२२) * २७९०९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २०९५८ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणीसह मराठवाडयातील अनेक जिल्हयात हजारो सिंचन विहिरी केवळ कागदोपत्रीच व निकषांची पुर्तता न करता करण्यात आल्याने माहे एप्रिल-मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सर्व जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणीसह मराठवाडयातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी सिंचन विहिरीतील गैरप्रकारांचे अहवाल शासनाकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील राज्य कामगार विमा रुग्णालयाची (एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन) दुरवस्था झाल्याबाबत

**(२३) * २९०७६ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील राज्य कामगार विमा रुग्णालयाची (एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन) दुरवस्था झाल्याने रुग्णांच्या संख्येत घट झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या दुरवस्थेबाबत संबंधिताना पत्रव्यवहार करुनही कोणती कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयाचे नुतनीकरण व सोई-सुविधा पुरविण्याबाबत तसेच त्याकरिता निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१० मध्ये राज्यमंत्रीमंडळाने राज्य कामगार विमा योजना राज्य कामगार विमा महामंडळ नवी दिल्ली यांच्याकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा निर्णय घेतला होता. सदर हस्तांतरणाची प्रक्रिया केंद्र शासनामार्फत प्रलंबित राहिल्याने राकावि योजनेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा बाबत नवीन धोरणात्मक निर्णय होऊ शकला नाही, त्यामुळे वैद्यकिय सेवा सुविधा पुरविण्यामध्ये अडचण निर्माण झाली. राकावि महामंडळामार्फत टाय-अप केलेल्या १४३ खाजगी रुग्णालयामार्फत विमाधारकांना वैद्यकीय उपचार पुरविण्यात आले आहेत. रुग्णांना प्रभावीपणे वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता सद्य:स्थितीत राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

राकावि योजनेतील ११ राकावियो रुग्णालयांपैकी ३ रुग्णालयांच्या इमारती शासनाच्या मालकीच्या व उर्वरीत ८ रुग्णालयांच्या इमारती केंद्र शासनाच्या मालकीच्या आहेत. शासनाच्या मालकीच्या वरळी रुग्णालयाचे Structural Audit

करण्यात आले आहे. मुलुंड व नागपूर रुग्णालयांच्या Structural Audit बाबत कार्यवाही सुरु आहे. या व्यतिरिक्त शासनाने सन २०१५-१६ मध्ये मुलुंड व नागपूर रुग्णालयांच्या विशेष दुरुस्ती करीता अनुक्रमे रु.३,५०,६३,३३०/- व रु.३,०८,३५,८२०/- इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली असून त्यानुषंगाने पहिल्या टप्यातील कामे पूर्ण केले असून दुसऱ्या टप्यातील विशेष दुरुस्तीच्या कामांबाबत कार्यवाही सुरु आहे.

राकावि महामंडळाच्या मालकीच्या ८ रुग्णालयांपैकी ठाणे, उल्हासनगर, सोलापूर व नाशिक रुग्णालय इमारतींचे Structural Audit बाबत राकावि महामंडळामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त राकावि महामंडळामार्फत मागील ४ वर्षात उल्हासनगर, ठाणे व महात्मा गांधी स्मारक रुग्णालय या तीन रुग्णालयांकरीता विशेष दुरुस्तीच्या कामासाठी अनुक्रमे रुपये ३३,८७,११८/-, रुपये २,११,७५१/- व रुपये १७,९८,४८५/- इतक्या रक्कमेची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. राकावियो रुग्णालय वरळी, मुलुंड व नागपूर या ३ रुग्णालयांकरीता X-Ray Machine ५०० mA व Computer Radiography System खरेदी करण्यात आले असून ९ राकावियो रुग्णालयांकरीता एकूण ९९ वैद्यकीय उपकरणे खरेदीबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत**

**(२४) * २९२२८ श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, ५ दिवसांचा आठवडा करणे, निवृत्तीचे वय वर्ष ६० करणे, महिलांना २ वर्षाची बालसंगोपन रजा व इतर प्रलंबित मागण्यां पूर्ण करण्याबाबत माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ३ दिवसांचा संप पुकारण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा, महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर यांना बालसंगोपनासाठी दोन वर्षापर्यंत केंद्र शासनाप्रमाणे भरपगारी रजा, लहानग्यांच्या स्तनपानासाठी व्यवस्था आणि पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे व इतर प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. संघटनेच्या मागण्यांवरील कार्यवाही धोरणात्मक निर्णयाशी संबंधित आहे. त्यामुळे सदर मागण्यांबाबत निवडणुकीची आचार संहिता संपल्यानंतर निर्णय घेणे योग्य होईल, या शासनाच्या भुमिकेस सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने संघटनांनी दिनांक १८ जानेवारी ते २० जानेवारी, २०१७ या कालावधीचा नियोजित संप मागे घेतला आहे.

(२), (३) व (४) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ ची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंत्रीमंडळाच्या मान्यतेअंती शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागु करण्याची कार्यवाही करण्यात येते.

पाच दिवसाचा आठवडा लागु करणे, निवृत्तीचे वय वर्ष ६० करणे, महिलांना २ वर्षाची बालसंगोपन रजा या मागण्या शासनाच्या विचाराधीन आहेत.

शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्ष करण्याच्या अनुषंगाने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली असून या समितीस अहवाल सादर करण्यासाठी सहा महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

लहानग्यांच्या स्तनपानासाठी व्यवस्था तसेच पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देणे याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीसाठी जाचक अटी लागू केल्याबाबत**

**(२५) * २९०८७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीसाठी यावर्षापासून अनुसूचित जाती/जमातीमध्ये दारिद्रय रेषेखालील अल्पभूधारक, इंदिरा आवास लाभार्थी दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र, जॉबकार्ड या जाचक अटी लागू करण्यात आल्याने ही योजना अयशस्वी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ कोकणात घेण्यासाठी सह हिस्सेदारांची परवानगी घेणे आवश्यक आहे, परंतु सातबारे वेगळे नसल्याने अल्पभूधारकांना या योजनेचा लाभ घेण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेतील जाचक अटी कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही.

(२), (३) व (४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर कृषि विभागामार्फत फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्याबाबतचा निर्णय विभागाच्या दिनांक २० जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. ही जमीन कुळ कायदयाखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात यावी अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांची संमती घेऊन शेतकरी लागवड करू शकतात.

-----------------

**गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सिंचन विहीर वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२६) * २९०३१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सर्व निकष डावलून ९८० सिंचन विहीरींना मंजूरी दिल्याबाबत जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालात तत्कालीन प्रभारी गटविकास अधिकारी व काही संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना दोषी ठरविल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय. हे खरे आहे.

(२) प्राथमिक चौकशी अंती तत्कालीन दोन गटविकास अधिकारी दोषी आढळल्याने त्यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी निलंबित केले असून त्यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चिकलठाणा (औरंगाबाद) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२७) * २८८७८ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १४८७८ ला दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (औरंगाबाद) येथे सन २०११ मध्ये २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयास मान्यता मिळाली व इमारतीचे काम पूर्ण झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी विविध मोठी उपकरणे व फर्निचरसाठी रुपये १२ कोटीचा निधी लागणार असून तसा प्रस्ताव विभागाने शासनाकडे दिला असून त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपकरणे खरेदी करुन, पदनियुक्ती करुन माहे जून, २०१७ पासून ओपीडी सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

चिकलठाणा, औरंगाबाद येथील २०० खाटांच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या बांधकामाला शासन निर्णय दिनांक १६/११/२०११ नुसार रुपये ३८३१.५३ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. इमारतीच्या बांधकामास दिनांक ५/०३/२०१२ रोजी सुरुवात करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत रुग्णालयाचे ९७ टक्के बांधकाम पुर्ण झालेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद करीता यंत्रसामुग्री खरेदी करण्याबाबतचा सुमारे रुपये ९.३५ कोटी रकमेचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे दिनांक ३१/०१/२०१७ चे पत्रान्वये प्राप्त झाले आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) रुग्णालयाकरीता उपकरणे खरेदी करण्याबाबतचा दिनांक ३१/०१/२०१७ चा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. शासन निर्णय दिनांक २९/१२/२०१६ नुसार रुग्णालयातील गट-अ ते गट-ड संवर्गातील २७८ पदांच्या पदनिर्मितीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. रुग्णालयाच्या इमारतीचा ताबा मिळाल्यानंतर बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------

## टी.एच.आर. घरपोच पोषण आहार योजना पुरवठया संदर्भातील नविन निविदा प्रक्रियेबाबत

**(२८) * २८९७८ श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक २४६६६ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टी.एच.आर. घरपोच पोषण आहार योजना पुरवठया संदर्भातील नविन निविदा प्रक्रियेच्या विरोधात औरंगाबाद खंडपीठामध्ये शासनाच्या बाजूने निकाल लागलेला असतानाही शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या बाजूने निकाल लागलेला असतानाही अपिलात जाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाचे पुढील घरपोच पोषण आहार योजना संदर्भातील नवीन धोरण काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) सदर निविदेच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रीट याचिका क्र.३३८७/२०१६ दाखल झालेली होती. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी आदेश दिलेले आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत विधी व न्याय विभाग व राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांनी सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्याबाबत सल्ला दिलेला आहे. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा यांचेकडून मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्यात आलेली आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घरपोच पोषण आहार योजने संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**के.पी.बक्षी, माजी अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत झाल्याबाबत**

**(२९) * २६७७२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.कपिल पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २२६४६ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाचे लाभ देण्यासाठी शासनाने माजी अतिरिक्त मुख्य सचिव के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती गठीत केल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयाचे महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघ आणि र. ग. कर्णिक प्रणित राज्य शासकीय मध्यवर्ती कर्मचारी संघटनेने स्वागत केले आहे, त्याचबरोबर केंद्राप्रमाणेच राज्य शासकीय कर्मचा-यांना सुधारित वेतनावर दोन टक्के अधिक महागाई भत्ता देण्याचा निर्णय घ्यावा व त्यांची अंमलबजावणी दिनांक १ जुलै, २०१६ पासून करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीला अहवाल सादर करण्यास किती कालावधी देण्यात आला आहे व या वेतन आयोगासाठी निधीची तरतूद करुन शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अहवाल सादर केल्यानंतर किती दिवसात शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाने दिनांक १ जुलै, २०१६ पासून असुधारित वेतनावर ७ टक्के महागाई भत्ता वाढ देण्याची विनंती केली आहे.

(३), (४) व (५) या समितीला अहवाल सादर करण्याकरिता कालावधी विहित केलेला नाही. राज्य शासनाचे आर्थिक स्त्रोत विचारात घेऊन वेतन आयोगासाठी निधीची तरतुद करण्यात येते. अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंत्रीमंडळाच्या मान्यतेअंती शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करण्याची कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## महाराष्ट्र नागरी मंडळातर्फे प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सेवा सुरु करण्याबाबत

**(३०) * २७१८६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व रायगड येथील समुद्रकिनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरीकांना आजारपणात त्वरीत उपचार मिळावे म्हणून महाराष्ट्र नागरी मंडळातर्फे प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरु करणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे व मांडवा येथे सदर रुग्णवाहिका सेवा सुरु करण्यात येणार आहे, परंतु अलिबाग व मुरुड या ठिकाणी या रुग्णवाहिकेची आवश्यकता असल्याने येथेही रुग्णवाहिका सेवा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय व अनुदानित आयुर्वेदिक महाविद्‌यालयांमधील अधिष्ठाता, प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयात तफावत असल्याबाबत**

**(३१) * २८२१५ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय आयुर्वेदिक महाविद्‌यालये व अनुदानित आयुर्वेदिक महाविद्‌यालयांमधील अधिष्ठाता, प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांना शासनाकडून मिळणा-या वेतनसोबतच इतर सर्व बाबी समान असतांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेतील तफावत दूर करण्याच्या मागणीबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) अनुदानित महाविद्‌यालयातील शिक्षकांचे वय वाढविण्यासंबंधी संचालक, आयुष यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायासाठी सादर करण्यात आला होता. त्यावर वित्त विभागाने अधिकचा खुलासा विभागाकडे मागितला आहे. सदर खुलासा संचालक कार्यालयाकडून दिनांक ८/२/२०१७ अन्वये प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालाची छाननी करुन खुलासा वित्त विभागास सादर करण्यात येत आहे.
(३) धोरणात्मक बाब असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाडा विभागासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करण्याबाबत**

**(३२) * २८१६७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३४९४ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्यास दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारण आयुक्तालयाचे स्वरूप, निधी व इतर प्रशासकीय बाबी यासंदर्भातील प्रस्ताव उच्चाधिकार समितीच्या मान्यतेनंतर मंत्रीमंडळास सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा विभागासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या सक्षम जल आयुक्तालयाचे स्वरूप कसे आहे, तसेच नवीन जल आयुक्तालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक निधी आणि प्रशासकीय बाबींची पूर्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) व (४) दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत औरंगाबाद येथे जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. जलसंधारण आयुक्तालयाचे स्वरुप आवश्यक निधी व इतर प्रशासकीय बाबी या संदर्भातील प्रस्ताव उच्चाधिकार समितीसमोर ठेवण्यासाठी वित्त विभागास फेरसादर करण्यात आला आहे. उच्चाधिकार समितीच्या मान्यतेनंतर सदरहू प्रस्ताव मंत्रीमंडळास सादर करण्यात येईल.

-----------------

**श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी इन्स्टिटयूट ऑफ मेडीकल सायन्स आणि रिसर्च (ता.खटाव, जि.सातारा) येथे एम.बी.बी.एस. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशात अनियमितता झाल्याबाबत**

**(३३) * २६७२३ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी इन्स्टिटयूट ऑफ मेडीकल सायन्स आणि रिसर्च (ता.खटाव, जि.सातारा) या महाविद्यालयामध्ये सन २०१४-१५ या वर्षात एम.बी.बी.एस. प्रथम वर्ष अभ्यासक्रमात इतर विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांची फसवणूक करून त्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी समिती नेमली असता, महाविद्यालयातील प्रशासन दोषी असल्याचे निष्पन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महाविद्यालयातील प्रथम वर्ष २०१४-१५ च्या एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयात सामावून घेण्यासंबधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार महाविद्यालय प्रशासन दोषी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) विद्यार्थ्यांचे सन २०१४-१५ चे प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाचे प्रवेश हे महाविद्यालयामार्फत योग्य पध्दतीने करण्यात न आल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे सदर प्रवेशास मान्यता देण्यात आलेली नाही. तसेच, यासंदर्भात विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये राज्य शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या समर्थनात बाजू मांडण्यात आली होती. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांची याचिका फेटाळली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील काळू नदीवरील बंधा-याला गळती लागल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत

**(३४) * २८२६४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील काळू नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याची गळती होत असल्याने या बंधा-यातून दररोज लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीनी व त्यापूर्वी या परिसरातील नागरिकांनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे सदरहू गळती दुरुस्त करण्याबाबत मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ओहत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) काळू नदीवर जलसंपदा विभागांतर्गत टिटवाळा को.प.बंधारा, ता.कल्याण असून त्यामधून कमी प्रमाणात गळती होत आहे. तसेच जलसंधारण विभागाच्या अखत्यारितील दहिवली को.प. बंधा-यातून अंशत: गळती होत आहे.

(२) होय.

(३) टिटवाळा को.प. बंधारा हा सन १९८४ मध्ये पूर्ण झाला असून या बंधाऱ्याच्या लोखंडी नादुरूस्त दरवाज्यामधून काही प्रमाणात गळती होत आहे. नविन बर्गे बसविणे व बंधाऱ्याच्या आवश्यक दुरूस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करणे नियोजित आहे. दहिवली बंधा-याच्या डाव्या तिरावरील मऊ भुस्तरातून काही प्रमाणात गळती असून त्याठिकाणी संरक्षक भिंतीचे काम नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देहरजी मध्यम (ता.विक्रमगड, जि.पालघर) या आदिवासी भागातील सिंचन प्रकल्पाचे काम सुरू करण्याबाबत**

**(३५) * २७०८१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहरजी मध्यम (ता.विक्रमगड, जि.पालघर) या आदिवासी भागातील सिंचन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही सदर प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार देहरजी सिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण करून सिंचनाची व पिण्याचे पाण्याची टंचाई दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) देहरजी पाटबंधारे प्रकल्पास शासनाची मूळ प्रशासकीय मान्यता सन १९७९ मध्ये प्राप्त झाली होती. तथापि सदरची मान्यता ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होवूनही कोणतीही आर्थिक तरतूद नसल्याने ती व्यपगत झाली.

तद्नंतर कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने दिनांक २१/१०/२००५ च्या निर्णयान्वये सदर प्रकल्पास पुन:प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरचा प्रकल्प हा सिंचन प्रकल्प प्रस्तावित होता. तथापि शासन निर्णय, दिनांक ०४/०३/२०१४ नुसार हा प्रकल्प वसई विरार शहर महानगर पालिकेच्या पिण्याच्या पाण्यासाठी महापालिकेच्या आर्थिक स्त्रोतातून विकसित करावयाचा आहे.

प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. भूसंपादन व संकल्पचित्र तयार करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत**

**(३६) * २८०४७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २५०९३ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड आणि महागांव तालुक्याच्या (जि.यवतमाळ) सीमेवर असलेल्या बंदी भागातील कोरटा, चिखली, बालतूर, भवानी, निंगनूर या आदिवासी क्षेत्रात बोगस डॉक्टरांनी दवाखाने उघडल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बोगस डॉक्टरांकडे कोणतीही वैद्यकीय पदवी नसतांना रुग्णांवर उपचार करुन रुग्णांची आर्थिक फसवणूकही करीत आहे, सदर डॉक्टरांच्या पदव्या तपासून बोगस डॉक्टरांविरुध्द शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगळवेढा (जि.सोलापूर) परिसरात होत असलेल्या अवैध वृक्षतोडीबाबत**

**(३७) * २७९९६ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) परिसरात वन विभागाच्या दुर्लक्षामुळे अवैध वृक्षतोड होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, यामध्ये परिसरातील गावांमधील व गावांच्या बाहेरील अनेक व्यापारी सक्रीय असल्याने इलेक्ट्रिक करवतीच्या सहाय्याने शेकडो वर्ष जुनी मोठमोठी वृक्ष काही तासात जमीनदोस्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वृक्षतोड थांबविण्याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) मंगळवेढा परिसरातील वनक्षेत्रात अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी क्षेत्रीय वन अधिकारी, वनकर्मचारी यांच्यामार्फत गस्त घालण्यात येत आहे. वनसंरक्षणासाठी शासनाकडून पेट्रोलिंग वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याचा वापर करुन वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. वनपरिक्षेत्र निहाय संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करुन त्यानुषंगाने अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. तसेच अवैध वृक्षतोड प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत दिलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण पंचायत समिती (ता.कल्याण, जि.ठाणे) कार्यालयाची नवीन इमारत बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(३८) * २८६१४ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पंचायत समिती (ता.कल्याण, जि.ठाणे) कार्यालयाच्या इमारतीची दूरवस्था झाल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयाची नवीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवूनही यावर कोणताही निर्णय झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कार्यालयाची इमारत धोकादायक झाल्याने कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालून कामे करावी लागतात, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन इमारत बांधण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे

(२) जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हा परिषदेला कळविण्यात आले आहे

(३) व (४) सर्व कर्मचाऱ्यांना इमारतीच्या सुरक्षित जागेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच, वापरातील इमारतीची आवश्यकतेनुसार डागडूजी करण्यात आली आहे. कल्याण पंचायत समिती नवीन इमारत बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या जादा FSI ची मागणी करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून नगर विकास विभाग मंत्रालय यांच्याकडे दिनांक ६/०१/२०१७ रोजी सादर केला आहे.

-----------------

**विदर्भ, मराठवाडयासह मागास भागातील अनुशेष दूर करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील शिफारशींबाबत**

**(३९) * २७६७३ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडयासह मागास भागातील अनुशेष दूर करण्यासाठी डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने सन २०१३ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालावर मा.वित्तमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ. विजय केळकर समितीच्या अहवालातील शिफारशींबाबत आता कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकास-उच्चस्तरीय समितीने दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात मा.मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उप समिती गठित करण्यात आलेली आहे.

(२) समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात अहवाल मंत्रिमंडळास सादर करण्यासाठी प्रशासकीय विभागांबरोबर मंत्रिमंडळ उप समितीच्या बैठका आयोजित करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाच्या वन उद्यान योजनेंतर्गत मान्यता दिलेल्या वन उद्यानांच्या विकासासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४०) * २६८९४ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या वन उद्यान योजनेंतर्गत राज्यात नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ व पुण्यात दोन अशा पाच ठिकाणी वन उद्यानांना मान्यता दिल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वन उद्यानांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. तथापि, यवतमाळ येथील योजना राज्य निधीतून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याऐवजी कोल्हापूर येथील मुडशिंगी या योजनेचा समावेश करण्यात आला आहे.

(२) सदर योजना केंद्र शासनाकडून ८०% व २०% राज्य सहभाग अशी राबविली जाणार आहे. केंद्र शासनांतर्गत ८०% हिस्स्याच्या रुपये ५५६.८० लक्ष रक्कमेपैकी ५०% रक्कम म्हणजे रुपये २७८.४० लक्ष दिनांक २६/१०/२०१६ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर निधी मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), नागपूर, चंद्रपूर, कोल्हापूर व पुणे यांना दिनांक ०४/११/२०१६ रोजी वाटप करण्यात आलेला असून योजनेची कामे सुरु आहेत. उर्वरित ५०% रक्कम उपलब्धतेबाबत केंद्र शासनाकडे पाठपूरावा करण्यात येत आहे. सदर योजनेसाठी राज्य हिस्स्याची २०% रक्कम उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बेलोरा प्राथमिक आरोग्य केंद्रात (ता.पुसद, जि.यवतमाळ) डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४१) * २८०७४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोरा प्राथमिक आरोग्य केंद्रात (ता.पुसद, जि.यवतमाळ) कुटुंब कल्याण नियोजन शस्त्रक्रियेसाठी आलेल्या महिलेची शस्त्रक्रिया करतांना डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शस्त्रक्रियेत इतर दोन महिलांची शस्त्रक्रिया करण्यात आली, परंतु वेळेवर उपचार झाल्याने त्या सदर शस्त्रक्रियेमधून वाचल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टरांकडून शस्त्रक्रिया शिबीर घेतले जात असतांना सदर घटनेची वरिष्ठांना माहिती देण्यात आली होती काय, तसेच उपरोक्त गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय खरे आहे. एकूण १५ कुटुंब कल्याण नियोजन शस्त्रक्रियापैंकी ३ महिलांना शस्त्रक्रियेदरम्यान गुंतागुंत झाल्याची लक्षणे आढळून आली व त्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित केले. यात एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला व इतर २ महिलांवर परत शस्त्रक्रिया व उपचार करुन वाचविण्यात आले.

(३) सदर घटनेची माहिती वरिष्ठांना देण्यात आली होती व जिल्हा शल्य चिकित्सक, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून चौकशी केली व त्यानुसार दोषी वैद्यकीय अधिकारी यांचे निलंबन प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हा परिषदेंतर्गत सन २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या कंत्राटी ग्रामसेवकांच्या भरती प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४२)** * **२७२३८ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषदेंतर्गत सन २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या कंत्राटी ग्रामसेवकांच्या भरती प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष मुलाखतीला गैरहजर असलेल्यांची नावे प्रतीक्षा सूचीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मूळ कागदपत्रांची तपासणीच्या दिवशी गैरहजर असलेल्या अनुसूचित जमातीच्या महिलांची नावे पात्र उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयातील विविध कामाबाबत**

**(४३) * २६७५१ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात रिक्त पदे, अर्धवट स्थितीत असलेली बांधकामे व रखडलेले विद्युतीकरणाचे काम यामुळे या रुग्णालयाची दूरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा रुग्णालयाची दूरवस्था दूर करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
एकूण ४१८ मंजूर पदांपैकी २९३ पदे कार्यरत असून १२५ पदे रिक्त आहेत. जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या टप्पा ५ चे कामकाज ८० टक्के पूर्ण होत आले असून, सद्य:स्थितीत प्लास्टरचे काम व विद्युतीकरणाचे काम सुरु आहे.
(२) जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथील बांधकामासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रुपये ४६,७०,०००/- इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर बांधकाम ८० टक्के पूर्ण झाले आहे. सद्य:स्थितीत प्लास्टरचे कामकाज, विद्युतीकरण बाहय रुग्ण विभाग, महिला शल्य विभाग इत्यादी कक्षाची कामे प्रगती पथावर असून मे, २०१७ अखेर ही कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच जिल्हाधिकारी यांचे समितीमार्फत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथील ट्रॉमा केअर सेंटर मध्ये रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सोई-सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(४४) * २७१५४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्यांत आले आहे, सदर रुग्णालयात राज्यातील व इतर राज्यातील रुग्ण मोठया प्रमाणात येत असून त्यांच्यासोबत रुग्णांच्या नातेवाईकांची संख्या सुध्दा वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णासोबत आलेल्या नातेवाईकांना इतरत्र जागा नसल्याने उघडयावरच नैसर्गिक क्रियापासून ते भोजन व रात्री निवारासुध्दा करावा लागतो तसेच रुग्णाच्या नातेवाईकांसाठी रुग्णालयाजवळ धर्मशाळा असून या धर्मशाळेच्या खोल्या रुग्णांच्या नातेवाईकांना न देता इतर रुग्णांना देण्यांत येत असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांना सोईसुविधा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालयाच्या परिसरामध्ये रुग्णांकरिता व त्यांच्या नातेवाईकांकरिता सुलभ शौचालयाची सोय उपलब्ध आहे. ट्रॉमा केअर सेंटरच्या परिसरात ३ धर्मशाळा असून त्यांच्यामार्फत अल्पदरात निवासाची व्यवस्था करण्यात येते. सदर धर्मशाळांमध्ये प्रामुख्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच ट्रॉमा केअर सेंटर येथे उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना प्राधान्य देण्यात येते.

(४) लागू नाही.

-----------------

## पुणेसह राज्यातील विविध धरणांतील साठविलेले पाणी बंद पाईप लाईनद्वारे शेतीला पुरविण्याची नवीन पध्दत रद्द करण्याबाबत

**(४५) * २७१३४ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणेसह राज्यातील विविध धरणांमध्ये साठवलेले पाणी कालव्यातून शेतीला पुरविले जात असून गेली अनेक वर्षे या पध्दतीचा वापर केला जातो, या पध्दतीत बदल करुन हे पाणी बंद पाईपलाईनद्वारे शेतीला पुरवावे असा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नवीन पध्दतीने शेतीचे नुकसान होऊ नये याद‍ृष्टीने शेतकऱ्यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

सिंचनासाठी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करुन जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याच्या उद्देशाने उघडया कालव्याऐवजी तांत्रिकद‍ृष्टया शक्य असेल तेथे बंद पाईपचा वापर करण्याबाबत धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) नाही.

किंबहुना पाईप वितरण प्रणालीचे फायदे विचारात घेऊन अनेक प्रकल्पावर कालव्याऐवजी पाईप लाईन करण्याच्या मागण्या येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याबाबत**

**(४६) * २८१०२ श्री.जयंत पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.तानाजी सावंत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नारायण राणे, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी नव्याने ७४ आरोग्य उपकेंद्र, २० प्राथमिक आरोग्य केंद्र, १ ग्रामीण रूग्णालय, ३ उपजिल्हा रूग्णालय, २ जिल्हा रूग्णालय, ४ स्त्री रूग्णालय व ६ ट्रामा केअर युनिट अशा १११ नवीन आरोग्य संस्था सुरू करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी १ हजार ३३२ विविध पदे नव्याने निर्माण करण्यात येणार आहेत, तसेच राज्यात सुरू असलेले जिल्हा सामान्य रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय इत्यादी रूग्णालयात रिक्त असलेली विविध पदे भरण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील विविध ग्रामीण भागांत असलेल्या जवळपास ५८१ डॉक्टर्सनी १५ वर्षांपासून शासकीय वैद्यकीय सेवा सोडल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वैद्यकीय अधिका-यांपैकी आतापर्यंत १०४ जणांवर सेवेतून बडतर्फ करुन इतर ४७७ अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच रुग्णालयातील रिक्त पदे तसेच तज्ञ डॉक्टरांची पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०२/०१/२०१७ अन्वये १११ आरोग्य संस्थासाठी एकूण १३३२ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवा समाप्त करण्याबाबतचा ४८५ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यापैकी ९६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असून उर्वरीत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) व (५) जिल्हाधिकारी स्तरावर मुलाखतीद्वारे वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात पाणी वापराच्या बृहत आराखड्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(४७) * २६८१२ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाबाबत राज्याची भुमिका निश्चित करणेच्या दृष्टीने दमणगंगा, नार-पार, औरंगा, अंबिका या नदीखोऱ्यातील राज्यातील जलनियोजन (पाणी वापराचे बृहत आराखडा) अंतिम करणे गरजेचे आहे याकरिता शासन निर्णय दिनांक ४ एप्रिल, २०१६ अन्वये मुख्य अभियंता स्तरावरील समिती गठीत करण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीस खोऱ्यातील पाणी उपलब्धता, कोकणातील स्थानिक पाण्याची गरज यासाठीचे कोकणातील पूर्ण, बांधकामाधीन व भविष्यकालीन प्रकल्प तसेच तांत्रिक व आर्थिकदृष्टया व्यवहार्य गोदावरी व तापी खोऱ्यातील पूर्ण बांधकामाधीन व प्रस्तावित वळण योजनांचा अभ्यास करून पाणी वापराचा बृहत आराखडा शासनास सादर करणेबाबत उक्त समितीस निर्देशित करण्यांत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत समितीने अभ्यासपूर्ण पाणी वापराचा बृहत आराखडा शासनास सादर केला आहे काय, तसेच सदर आराखड्यातील प्रमुख योजना व बाबींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे आणि त्यानुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे ही खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) सदर अहवाल ढोबळ तांत्रिक पडताळणी व व्यवहार्यता अभ्यासावर आधारित आहे. सदर अहवालातील पाणी वापराच्या बृहत आराखडयानुसार दमणगंगा पिंजाळ नदी खो-यात १४७८.९७ दलघमी व नार-पार, अंबिका, औरंगा खो-यात ८८७.६६ दलघमी पाणी वापर प्रस्तावित आहे. या अहवालातील पाणी वापराच्या बृहत आराखडयाचा सविस्तर तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करुन त्यानंतरच शासन याबाबतचे धोरण निश्चित करणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नोटाबंदीच्या कालावधीनंतर राज्यातील आर्थिक व्यवहार सुरळीत करण्याबाबत**

**(४८) * २७८६२ ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ८ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर, २०१६ या नोटाबंदीच्या कालावधीत पैसे काढण्यासाठी बँकासमोर लावलेल्या रांगांमध्ये मानसिक व शारिरीक त्रास असह्य झाल्याने राज्यातील पन्नासपेक्षा अधिक नागरिकांना प्राण गमवावा लागल्याने संबंधित मृतांच्या वारसांनी शासनाकडे आर्थिक व अन्य मदतीबाबत शासनाकडे निवेदने सादर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नोटाबंदीच्या काळात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसास आर्थिक सहाय्य देण्याबाबत व राज्यातील आर्थिक व्यवहार सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, उल्हासनगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे. तसेच इतर काही राजकिय व सामाजिक संस्थांची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) नोटाबंदी हा विषय केंद्र शासनाशी संबंधीत असल्यामुळे त्याचा महाराष्ट्र शासनाशी कोणताही संबंध येत नाही. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेले नसल्यामुळे त्यांना आर्थिक सहाय्य देण्यात आलेले नाही.

राज्यातील आर्थिक व्यवहार सुरळीत होण्यासाठी शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत:-

१) सर्व विभागांच्या सचिवांना केंद्र शासनाचे सूचनेप्रमाणे राज्य शासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्था येथे जुन्या नोटा स्विकारण्याची आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविले.

२) दिनांक ११/११/२०१६ रोजी सर्व सचिवांना नगर विकास विभागाने परिपत्रकाव्दारे दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक कार्यवाहीच्या सूचना निर्गमित करण्याबाबत सूचित करण्यात आले.

३) दिनांक १२/११/२०१६ रोजी विक्रीकर विभागाने जुन्या नोटांव्दारे कर भरणा करणेबाबत अधिसूचना निर्गमित केली.

४) दिनांक १४/११/२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड व सर्व संबंधीत विभागाच्या सचिवांची बैठक घेतली त्यावेळी चिफ पोस्ट मास्तर जनरल हे सुध्दा हजर होते.

५) मा.मुख्यमंत्री यांनी सर्व खाजगी हॉस्पिटलना धनादेश स्विकारणेबाबत आवाहन केले व काही प्रसंगी धनादेश परत आल्यास मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुपये १००००/- पर्यंत त्वरीत प्रतिपूर्ती व पुढील कार्यवाहीबाबत आश्वासित केले.

६) दिनांक १५/११/२०१६ रोजी मंत्रीमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली. सदर समितीची बैठक झाली त्या अनुषंगाने मा.मंत्री (वित्त), मा.मंत्री (जलसंपदा), वित्त विभागातील सर्व सचिव, सहकारी बँकेचे प्रतिनिधी यांनी रिझर्व्ह बँक, मुंबई येथे जाऊन डेप्युटी गर्व्हरनर यांचेबरोबर चर्चा केली व अडचणी विशद केल्या.

७) दिनांक १६/११/२०१६ रोजी हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली. याच विषयी मुख्य सचिव कार्यालयांनेही सर्व जिल्हाधिकारी यांना आवश्यक सूचना निर्गमित केल्या. प्रत्येक जिल्हयात हेल्प लाईनकरिता बँकेचा प्रतिनिधी असावा याविषयी मेंबर सेक्रेटरी SLBC यांना कळविण्यात आले.

८) बँकेतील गर्दी कमी व्हावी व निवृत्तीवेतनधारकांना गर्दीचा त्रास होऊ नये म्हणून हयातीचा दाखला माहे नोव्हेंबर अखेर सादर करणेऐवजी ती मुदत १५ जानेवारी, २०१७ पर्यंत वाढविण्यात आली.

९) दिनांक २१/११/२०१६ रोजी मुख्य सचिव यांनी सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांचेसोबत व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे या विषयाचा आढावा घेतला व आवश्यक त्या सूचना दिल्या.

१०) शेतकऱ्यांना ५० किलो पर्यंत भाजीपाला विनाभाडे एस.टी. मधून वाहतूक करण्याचा निर्णय घेण्यात आला.

११) केंद्र सरकारने जाहिर केल्याप्रमाणे वेळोवेळी राज्य सरकारनेही रस्त्यावरील टोलमाफी जाहीर केली.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील अंगणवाडयांना इमारत बांधून देण्याबाबत**

**(४९) * २९१४० श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २४३०१ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात बालमृत्यू व वाढते कुपोषण रोखण्याकरिता सुरु असलेल्या अंगणवाड्यांपैकी १४१२ अंगणवाडी केंद्रांना स्वतःची इमारत नसल्याने इतरत्र अंगणवाडी भरत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतरत्र अंगणवाडी भरत असल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी अंगणवाडीची इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्हयातील एकूण ३१८३ मंजूर अंगणवाडी केंद्रांपैकी १३१८ केंद्रांना स्वत:ची इमारत नसल्याने ती खाजगी जागेत, प्राथमिक शाळेत, समाजमंदिरे व अन्य ठिकाणी भरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सन २०१५-१६ मध्ये आदिवासी उपयोजनेच्या निधीमधून २६ अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून जिल्हा नियोजन समितीच्या सर्वसाधारण निधीमधून ६ अंगणवाडी केंद्र बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१६-१७ मध्ये आदिवासी उपयोजनेच्या निधीमधून ३० अंगणवाडी केंद्र बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रुग्णासाठी जीवनदान ठरणा-या रक्ताच्या पिशवीच्या किंमतीत वाढ झाल्याबाबत**

**(५०) * २८४२१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुग्णांसाठी जीवनदान ठरणा-या रक्ताच्या पिशवीच्या किंमतीत वाढ झाली असून शासकिय रक्तपेढीत ४५० रुपयांना मिळणारी रक्तपिशवी ८५० रुपयांना मिळते तर खासगी रुग्णालयात ८५० रुपयांना मिळणा-या रक्तपिशवीच्या दरामध्ये वाढ होऊन तिचा दर दोन हजारांपर्यंत वाढविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्तपिशवीच्या दरात वाढ करण्याचे अधिकार कोणाकडे आहेत, तसेच रक्त पिशवीच्या दरासंदर्भात निर्णय घेण्याबाबत शासनाचे नियंत्रण नसल्याने रक्तपिशवीच्या दरात अतिरिक्त वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) शासकिय रक्तपेढीतील रक्त पिशवीच्या दरामध्ये वाढ झाली हे खरे आहे. मात्र ही वाढ रुपये ४५०/- वरुन रुपये ८५०/- एवढी आहे. खाजगी रक्तपेढीतील रक्त पिशवीचा दर रुपये १४५०/- प्रति पिशवी एवढा आहे.

(२) रक्त पिशवीच्या दरात वाढ करण्याचे अधिकार राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांना आहेत.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**शासकिय वैद्‍यकिय महाविद्‍यालय व रुग्णालय नागपूर येथील अतिदक्षता विभागाचे आधुनिकीकरण करण्याबाबत**

**(५१) * २८७११ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्‍यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय वैद्‍यकिय महाविद्‍यालय व रुग्णालय नागपूर येथील अतिदक्षता विभागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी ५ वर्षापूर्वी मंजूर करण्यात आलेला रुपये ६ कोटीचा निधी खर्च न करता तसाच ठेवण्यात आल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे,

(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी शासनाने रुपये ७ कोटीचा निधी मंजूर करुनही 'आयसीयू' चे काम संथगतीने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात जलजन्य आजारांची लागण रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(५२) * २७४८६ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २३६३१ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध भागात तसेच पुणे शहरात गॅस्ट्रो, अतिसार, टाईफाईड (विषमज्वर) आणि कॉलरा (पटकी) या जलजन्य आजारांमध्ये वाढ होऊन माहे जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत ११६ जणांना लागण झाली व गंभीर लागण झाल्याने ३० हून अधिक रुग्णांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या आजारांची लागण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अशंत: खरे आहे,

राज्यात सन २०१६ या वर्षामध्ये जलजन्य आजाराची लागण ११६ जणांना झाली नसून एकूण ११६ साथरोग उद्रेक झाले आहेत. त्यामध्ये ६०१२ रुग्ण आढळले असून, त्यापैकी ३० जणांचा मृत्यू झाला आहे.

पुणे शहरात या कालावधीत जलजन्य आजारामुळे एकही मृत्यू झालेला नाही.

(२) जलजन्य आजाराचे सनियंत्रण नियमित स्वरुपात राज्य स्तरावरुन करण्यात येते आणि जिल्हा तसेच मनपाकडून साथरोग अहवाल सादर करण्यात येतात उद्रेक ग्रस्त रुग्णांना क्षेत्रीयभेटी आणि मार्गर्शन करण्यात येते.

जलजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण यासाठी संपूर्ण राज्यात खालील उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येतात-

- जलजन्य आजाराचे नियमित रुग्ण सर्वेक्षण
- राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमार्फत पाणी गुणवत्ता तसेच विरंजक चूर्ण सनियंत्रण
- आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षारक्षकांचे पाणी शुद्धीकरणासाठी प्रशिक्षण
- पाणी पुरवठयाच्या पाईपमधील गळत्या शोधणे व दुरुस्तीसाठी पाठपुरावा करणे.
- व्दिवार्षिक स्वच्छता सर्वेक्षण
- पुरेसा औषध पुरवठा
- आंतर विभागीय समन्वय
- आरोग्य शिक्षण

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील डॉक्टरने मृत्यूचे दाखले देण्यात गैरव्यवहार केल्याबाबत

**(५३) * २६९०१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरात स्वतःचा छोटासा दवाखाना चालवणा-या डॉक्टराकडून एखाद्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या नातेवाईकांकडून पैसे घेऊन मृतदेहाची शहानिशा न करता मृत्यूचा दाखला देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डॉक्टराने मृत्यूचे दाखले देण्यासाठी नातेवाईकांकडून लाखो रुपये वसूल करण्याचा गैरव्यवहार सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने दोषी डॉक्टरांची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

दिनांक १३/०१/२०१७ रोजीच्या सकाळ या वर्तमान पत्रात कामोठे नवी मुंबई ता.पनवेल, जि.रायगड येथील डॉ.श्री.नितीन गणपत येवले यांनी दिनांक १२/०१/२०१७ रोजी काही रककम घेऊन मयत इसमाबाबत काहीही शहानिशा न करता, तसेच, मयताचा मृतदेह न पाहता, मयत झाल्याबाबतचा दाखला दिल्याबाबत बातमी प्रसिध्द झाली आहे.

सदर बातमी बाबत चौकशी करुन योग्य ती कारवाई होणेकामी कामोठे पोलीस ठाणे यांनी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांना पत्रे पाठविली आहेत.

(२) व (३) कामोठे पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र कौन्सिल आफॅ इंडियन मेडिसीन यांनी दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत डॉक्टरकडून स्पष्टीकरण मागविले.

संबंधीत डॉक्टर यांनी दिनांक २०/०२/२०१७ रोजी याविषयी स्पष्टीकरण परिषदेस पाठविले आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम २० अन्वये प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पांढरवाडी, कोळेवाडी, गोडसेवाडी व दिवडी (ता.माण, जि.सातारा) येथे अवैध वृक्षतोड झाल्याबाबत**

**(५४) * २७२३१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरवाडी, कोळेवाडी, गोडसेवाडी व दिवडी (ता.माण, जि.सातारा) गावांमध्ये सन २०१६ मध्ये मराठी अभिनेत्याच्या संस्थेमार्फत लावण्यात आलेल्या व आठ महिने वाढलेल्या १५ हजारांपेक्षा जास्त झाडांमधील पांढरवाडी येथे १०० हून अधिक वृक्षांची तोड केल्याची बाब दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्ष तोड प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मुंबईत वृक्षप्रेमी नागरिकांनी उपोषणही केले तसेच ग्रामस्थांनी वन विभाग, सातारा तसेच पोलीस ठाणे, माण या ठिकाणी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उर्वरित वृक्षांची जपणूक करण्याबाबत काय धोरण ठरविले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

तथापि, लागवड केलेल्या १५००० रोपांपैकी पांढरवाडी येथील ५२ रोपांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मौजे पांढरवाडी बस स्थानक ते प्राथमिक शाळा या जिल्हा परिषद ग्रामीण मार्ग क्रमांक ६२ च्या दुतर्फा लावणेत आलेल्या ९४ रोपांपैकी दिनांक १७/१/२०१७ रोजी श्री.छगन आप्पा मदने या इसमाने ५२ रोपे बुंदयाजवळ कुऱ्हाडीने तोडून नुकसान केलेले आहे. संबंधित ग्रामसेवक यांनी दहिवडी पोलीस स्टेशन मध्ये दिनांक १७/१/२०१७ रोजी तक्रार दाखल केलेली असून आरोपीस पोलीसांनी अटक करुन न्यायालयासमोर हजर केले नंतर त्यास न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. सदर गुन्हयातील आरोपीच्या विरुध्द दोषारोप पत्र पाठविण्या इतपत पुरावा गोळा झाल्याने दोषारोप पत्र पाठविण्याची मंजूरी मिळणेकामी गुन्हयाची कागदपत्रे उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग यांचेकडे पाठविण्यात आली आहेत.

तथापि, झालेल्या रोपांचे नुकसान भरुन काढणेसाठी वनविभागाने सदर संस्थेस दीड मीटर उंचीची रोपे वड, पिंपळ व सिंदी प्रजातीची ६० रोपे पुरवठा केली असून दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी त्या जागेवर लागवड केलेली आहे. पुन:श्च असा प्रकार होऊ नये याबाबत स्थानिक वनकर्मचारी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करीत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) येथील मुक्तिभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत

**(५५) * २६९१३ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २३६१२ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तिभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ग्रामविकास विभागास पाठविलेला प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडून पर्यटन विभागास माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला येथील मुक्तिभूमीवर येणाऱ्या पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या स्थळाचा 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळामध्ये समावेश करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय. येवला येथील मुक्तीभूमीला 'ब' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा मिळण्याबाबतचा प्रस्ताव पर्यटन विभागाला प्राप्त झालेला आहे.

(२) येवला येथील मुक्तीभूमीला 'ब' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मात्र, सदर ठिकाणास तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत

**(५६) * २९३७४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.अपूर्व हिरे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक १५१७९ ला दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या अनुषंगाने बिंदुनामावली (रोस्टर) अद्यावत करणेबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आले असून बिंदुनामावली प्रलंबित असल्यामुळे अनेक घटस्फोटाची प्रकरणे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच आंतरजिल्हा बदलीबाबत शासनाने सन २०१६ मध्ये नविन धोरण जाहीर केल्याची माहिती प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिंदुनामावली एकत्रित करणेबाबत जिल्हा परिषद शिक्षकांच्या विविध संघटना व लोकप्रतिनिधी मार्फत आंदोलने, उपोषणे करून शासनाकडे याबाबत वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यामध्ये अनेक जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत शिक्षकांनी त्यांच्या कौटुंबिक अडचणीमुळे मुळगावी नगरपरिषद किंवा महानगरपालिका येथे स्वेच्छेने बदल्या करुनही पूर्वी काम केलेल्या जिल्हा परिषदेकडे अनेकांची आर्थिक व सेवाविषयक बाबी संदर्भात मा.न्यायालयाने आदेश देवून सुद्धा आर्थिक व सेवाविषयक मान्यता पुर्ण झाल्या नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अमरावती महानगरपालिका हस्तांतरित शिक्षक कृती समिती यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना आर्थिक व सेवाविषयक लाभ मिळण्याकरिता विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांची आंतरजिल्हा बदलीची १० ते १२ वर्षापासून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व बिंदुनामावली एकत्रित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) बिंदु नामावली अद्ययावत करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र आंतरजिल्हा बदलीसाठी अद्यापि कोणतेही नविन धोरण निश्चित करण्यात आलेले नाही.

(३) होय.

(४) अशी बाब शासनस्तरावर आढळून आलेली नाही.

(५) अमरावती महानगरपालिका हस्तांतरीत शिक्षक कृती समितीने आर्थिक लाभ /गट विमा योजना/सामान्य भविष्य निर्वाह निधी याबाबत कोणतेही निवेदन दिले नाही.

(६) व (७) राज्यस्तरीय बिंदू नामावली करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत कनिष्ठ लिपिकच्या पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत

**(५७) * २९०८८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत दिनांक २० मे, २०१६ रोजी कनिष्ठ लिपिकच्या १० पदांसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेत गैरप्रकार झाल्याचे दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पद भरतीत २ उमेदवारांचे वय अतिशय कमी असून, पात्रता नसतांनाही त्यांची निवड यादीत नावे समाविष्ट करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलठाणा (जि.औरंगाबाद) परिसरात २०० खाटांचे मिनी घाटी रुग्णालयाच्या बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत

**(५८) * २९३३४ श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक १४८७८ ला दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलठाणा (जि.औरंगाबाद) परिसरात २०० खांटाचे मिनी घाटी रुग्णालयासाठी कमी निधी मिळाल्यामुळे रुग्णालयाचे काम अपूर्ण असल्याने गरीब रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पिय तरतुदीद्वारे निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, रुग्णालयाचे काम पूर्ण झाले नसल्याची बाब खरी आहे.
(२) सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी सन २०११ ते नोव्हेंबर, २०१६ पर्यंत रुपये ३४००.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रुपये १५०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच मार्च, २०१७ च्या पुरवणी मागणीव्दारे अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील अंगणवाडयांना इमारती उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५९) * २८८८३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात प्रकल्प क्र.१, २ व ३ अंतर्गत ३२३ अंगणवाडया कार्यरत असून त्यापैकी २२३ अंगणवाडया भाडयाच्या जागेत चालवल्या जात असून तेथे सोईसुविधा नसून त्यास प्रतिमहा फक्त रू. ७००/- भाडे दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाडयांना स्वत:च्या मालकीच्या इमारती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) औरंगाबाद शहरातील बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन औरंगाबाद महानगरपालिकेकडून जागा मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. औरंगाबाद शहरी प्रकल्पांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या पैठण, वैजापूर व गंगापूर या शहरातील एकूण २५ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी जागा उपलब्ध झालेल्या असून १९ अंगणवाडी केंद्रांची बांधकामे पूर्ण झालेली आहेत. तसेच ६ अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदूरबार तालुक्यातील वीरचक धरणाच्या ड्रेन व गेटमध्ये गळती सुरु असल्याने धरणाची दुरुस्ती करण्याबाबत

**(६०) * २८९८५ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार तालुक्यातील वीरचक धरणाच्या ड्रेन व गेटमध्ये गळती सुरु असल्याने मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणातून पाणी गळती होत असल्याने पाणीटंचाई उद्‌भवू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धरणाच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाने १०८ अत्यावश्यक हेल्पलाईनने सुरु करण्यात आलेली रुग्णवाहिका सेवा ग्रामीण भागातील रुग्णांना मोफत पुरविण्याबाबत

**(६१) * २६७७४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गरीब रुग्णांसाठी १०८ अत्यावश्यक हेल्पलाईनद्वारे सुरु करण्यात आलेली रुग्णवाहिका सेवा ही ३० कि.मी. पर्यन्त लागू असल्याने ग्रामीण भागातील वाडया, खेडयांमधून रुग्णांना रुग्णालयात दाखल करतांना ३० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावरील रुग्णालयात जावे लागते. त्यावेळी रुग्णास खाजगी रुग्णवाहिका घ्यावी लागत असल्याने आर्थिक अडचणीमुळे गरीब रुग्णांना प्राण गमवावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणात बदल करुन गरीब रुग्णांना मोफत रुग्णवाहिका सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पाच्या निविदा वा करारामध्ये किलोमीटरचे बंधन नाही तसेच प्रकल्पाच्या प्रलचित कार्यपध्दतीप्रमाणे रुग्णवाहिकेस ३० कि.मी. अंतरापर्यंतची मर्यादा लागू नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील रुग्णालयात कार्यरत परिचारीकांना आरोग्य विम्याचे संरक्षण मिळणेबाबत**

**(६२) * २७१८८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या परिचारीका विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची सेवा करत असताना परिचारीकांनाही नकळत अनेक रोगांची लागण होत असते, मात्र रुग्णांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या परिचारीकांना कोणत्याही प्रकारच्या आरोग्य विम्याचे संरक्षण नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेकदा मागणी करुनही शासनाने त्यांच्या आरोग्य विम्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय,

या संबंधात वर्तमानपत्रात बातमी आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचारी/अधिकारी व त्यांच्या कुंटुबियांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, याशिवाय कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे करीता वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना लागू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रखडलेले २६ सिंचन प्रकल्प वेगाने पुर्ण करण्यासाठी नाबार्डकडून कर्ज मिळण्याबाबत

**(६३) * २८२२२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नारायण राणे, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रखडलेले २६ सिंचन प्रकल्प वेगाने पुर्ण करण्यासाठी नाबार्डकडून मिळणा-या १२,७७३ कोटी रुपयांच्या कर्जापैकी ७५६ कोटी रुपयांचा पहिला हप्ता शासनाला मिळाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम कोणकोणत्या सिंचन प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उर्वरित कर्ज मिळावे यासाठी शासनाने नाबार्डकडे कोणता पाठपुरावा केला तसेच कर्ज मिळालेल्या रक्कमेची परतफेड करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रक्कम प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत समाविष्ट २६ प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे.

(३) नाबार्डकडुन येत्या ४ वर्षात रु.१२७७३ कोटी एवढे कर्ज मिळणार आहे. यापैकी सन २०१६-१७ या वर्षात रुपये २०९९ कोटी एवढे कर्ज मिळणार आहे. त्यापैकी रुपये १२२७ कोटी एवढा निधी जानेवारी, २०१७ अखेर प्राप्त झाला आहे. सदर

कर्ज मिळणेसाठी शासनामार्फत केंद्रीय जलसंसाधन विभाग व नाबार्डकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर कर्ज रक्कमेची परतफेड विभागास उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययातून करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील अस्थायी बी.ए.एम.एस. डॉक्टरांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(६४) * २६८४८ प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २४७९१ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुर्गम व मागास भागात सेवा देणाऱ्या ६८९ अस्थायी बी.ए.एम.एस. डॉक्टरांना कायम करण्याचे आश्वासन मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी देवूनही त्यांची अंमलबजावणी झाली नसल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अस्थायी बी.ए.एम.एस. डॉक्टरांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी तसेच आदेश निर्गमित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) सन २००६ ते सन २०११ या कालावधीत नियुक्ती दिलेल्या अस्थायी बी.ए.एम.एस.वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विक्रमगड व जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण, कुटीर रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६५) * २७०८२ श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड आणि जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात २५ पदांपैकी १२ पदे तसेच कुटीर रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने आदिवासी जनतेला आवश्यक सुविधा मिळत नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील अतिदुर्गम भागात आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा असून सर्पदंशावर उपचाराकरीता औषध सामुग्री नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार आदिवासी भागातील रुग्णांना पूर्णक्षमतेने औषधोपचार मिळावेत व सदर पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

पालघर जिल्हयातील विक्रमगड तालुक्यामध्ये १ ग्रामीण रुग्णालय व ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. ग्रामीण रुग्णालय विक्रमगड येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १५ पदे भरलेली व १० पदे रिक्त आहेत. तसेच, विक्रमगड तालुक्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण ६८ पदे मंजूर असून त्यापैकी ६२ पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत.

पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यामध्ये १ उप जिल्हा रुग्णालय व ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. उप जिल्हा रुग्णालय जव्हार येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण ९४ पदे मंजूर असून त्यापैकी ६४ पदे भरलेली व ३० पदे रिक्त आहेत. तसेच, जव्हार तालुक्यातील ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण १०१ पदे मंजूर असून त्यापैकी ८७ पदे भरलेली व १४ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

पालघर जिल्हयातील आरोग्य संस्थामध्ये सर्पदंशावरील लस/औषध व इतर औषधसाठा उपलब्ध आहे. तसेच, मध्यवर्ती औषध भांडारातसुध्दा औषधसाठा उपलब्ध आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००) संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.

ठाणे व पालघर जिल्हयातील कर्मचाऱ्यांची विकल्पाने समायोजनाची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे जिल्हा परिषद स्तरावरुन भरण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदपूर (जि.लातूर) येथे राज्य महामार्गावर ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत**

**(६६) * २८०५५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) येथे राज्य महामार्गावर होत असलेल्या अपघातातील रुग्णांना त्वरित उपचार प्राप्त होण्यासाठी माहे जुलै, २०१४ मध्ये ट्रामा केअर सेंटरच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रामा केअर सेंटरचे ९० टक्के काम पुर्ण झाले असून १० टक्के काम पूर्ण करण्यास दोन वर्षाचा कालावधी लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी तातडीने मंजूर करुन या कामास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर बांधकामास दिनांक २७/०७/२०१४ रोजी सुरुवात करण्यात आली होती. मागील दोन वर्षापासून अहमदपूर तालुक्यात दुष्काळ पडल्यामुळे पाण्याच्या टंचाई मुळे बांधकाम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. सदरील इमारतीचे बांधकाम दिनांक १५/०४/२०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६७) * २८४१५ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त असल्यामुळे सर्व सामान्य रुग्णांप्रमाणेच कैद्यांनाही उपचारासाठी खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय ३० खाटांचे असल्याने दररोज अंदाजे ३०० रुग्णांची ओपीडी असून गेल्या ३ वर्षापासून अधिक्षक पद रिक्त आहे त्याचबरोबर ३ वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजुर असूनही एकही डॉक्टर नसल्याने अपघातामधील मृतांचे शवविच्छेदन होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे वैद्यकीय अधिक्षक हे पद रिक्त असून सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक ०१/०४/२०१६ पासून जिल्हा शल्यचिकित्सक सोलापूर यांच्याकडे आहे. सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३ पदे मंजूर असून त्या पदावर दिनांक ०७/०१/२०१७ पासून ३ बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना व कैदयांना आवश्यक रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत. तसेच मृतांचे शवविच्छेदनही करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००) संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे पांढरेवाडी (ता.परंडा) येथील निम्न खैरी बृहत लघु पाझर प्रकल्पांतर्गत उजव्या कालव्याचे काम करण्याबाबत

**(६८) * २९४२६ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पांढरेवाडी (ता.परंडा) येथील निम्न खैरी बृहत. लघु पाझर तलावास महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ ऑगस्ट, १९९९ रोजी एकूण क्षेत्र ११५० हेक्टर ओलीताखाली येईल या अटीवर तत्वतः मान्यता दिलेली असतांनाही प्रकल्पांतर्गत तालुक्यातील (१) शेळगांव, (२) तांदुळवाडी, (३) देऊळगांव एवढेच क्षेत्र प्रकल्पाच्या उजव्या कालव्यांतर्गत ओलीताखाली येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असतानासुध्दा प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्यात न आल्यामुळे सदर कालव्याचे काम अपूर्ण असल्याने प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील एकूण ११५० हेक्टर शेत जमीन ओलीताखाली येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे पांढरेवाडी (ता.परंडा) येथील निम्न खेरी बृहत लघु पाझर तलाव यांचे उजव्या कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मा.जलसंपदा मंत्री महोदयाना पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) मौजे पांढरेवाडी ता.परंडा येथील निम्न खैरी बृहत. लघु पाझर तलाव प्रकल्पास महामंडळाच्या, दिनांक ०२/०७/९९ च्या निर्णयान्वये रुपये १८८१.७२ लक्ष इतक्या निधीस प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. या प्रकल्पाद्वारे पंराडा तालुक्यातील शेळगांव-३३४ हे., तांदुळवाडी-२९६ हे., देऊळगांव-३९२ हे. आणि डोंजा-१२७ हे. असे एकूण ११४९ हे. क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पाचे उजवा कालवा सर्वेक्षणाचे काम सन २०१४ मध्ये सरु केले असता मौजे शेळगाव येथील लोकांनी सर्वेक्षण करणेस तीव्र विरोध करून कालवा नको म्हणून ग्रामपंचायत मार्फत ठराव दिला आहे. त्या अनुषंगाने नियामक मंडळाच्या ८४ व्या बैठकीत ठराव क्र.८४/४, दिनांक ३/६/२०१४ अन्वये कालव्या ऐवजी खैरी नदीवर अस्तित्वात असलेले ६ को.प.बं. मध्ये धरणाचे पाणी सोडून सिंचन करणे बाबत मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार प्रकल्पाचे पाणी खैरी नदीत सोडणेसाठी विमोचक ते नदी असा जोड कालव्याच्या प्रस्तावास महामंडळाचे दिनांक २३/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दुष्काळ निर्मुलनासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेला 'जलयुक्त शिवार' प्रकल्प योजनाबध्द आणि शास्त्रीय पध्दतीने राबविण्याबाबत

**(६९) * २७७१९ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळ निर्मुलनासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेला 'जलयुक्त शिवार' प्रकल्पात अनेक त्रुटी व विसंगती असल्याचे दिसून येत असल्यामुळे सदर प्रकल्प योजनाबध्द आणि शास्त्रीय पध्दतीने राबविण्यासाठी नव्याने समिती स्थापन करण्याचा आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आलेले आहे व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या दिनांक ०१/५/२०१६ रोजीच्या प्रतिज्ञापत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्याचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीत याचिकाकर्त्याचा समावेश करावा अथवा याचिकाकर्त्यास समितीसमोर म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी.
(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २२ डिसेंबर २०१६ च्या आदेशाच्या अनुषंगाने तज्ञ समिती स्थापन करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झालेली असून दिनांक २७/०२/२०१७ रोजीच्या सुनावणीवेळी याबाबत अंतिम आदेश/शासन निर्णय पुढील सुनावणी पर्यंत न काढण्याचे मा.न्यायालयाचे आदेश आहेत.

-----------------

**राज्यातील गरीब रुग्णांना जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७०) * २६९०० श्री.संजय दत्त, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नारायण राणे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जेनेरिक औषधे प्रत्येक रुग्णालयात आणि स्थानिक औषध विक्रेत्यांकडे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला, परंतु जेनेरिक औषधांचा साठा बाजारात उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना परवडणा-या दरात औषधे मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच जनौषधी दुकानांमध्ये केवळ ६० ते ६५ टक्के औषधांचा साठा पुरवठादारांकडून येत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरीब रुग्णांना जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी या औषधांचा साठा बाजारात उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष बापट :** (१) जेनेरीक औषधांचा साठा बाजारात उपलब्ध होत नसल्याचे व रुग्णांना परवडणाऱ्या दरात औषधे मिळत नसल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) राज्यात सुरु करण्यात आलेल्या जन औषधी स्टोअर्स मधून ग्राहकांना प्रमाणित व प्रभावी जेनेरीक औषधे योग्य दरात उपलब्ध करण्यात येत आहेत. जन औषधी स्टोअर्समध्ये औषधांचा साठा उपलब्ध होत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याची तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली नाही.

सध्या राज्यात ५४ जनऔषधी स्टोअर्स व २३ इतर असे ७७ दुकाने जेनेरीक औषधांची विक्री करीत आहेत. तसेच प्रत्येक औषध पेढीमध्ये सुध्दा जेनेरीक औषधे उपलब्ध असतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील पैनगंगा व ऊर्ध्व पैनगंगा नदीवर बंधारे उभारण्याबाबत

**(७१) * २८१७२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील पैनगंगा नदी या वर्षी हिवाळ्यात कोरडी पडल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पैनगंगा नदी व ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पाणी देण्याकरीता नदीवर बंधारे उभारण्याबाबत संबंधित अधिकारी व संबधित मंत्र्यांना नागरिकांनी अनेक निवेदने देवूनही याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) शासनाने दुर्लक्ष केलेले नाही.

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत करण्यात आला आहे. तसेच योजनेसाठी दीर्घकालीन सिंचन निधीतून (नाबार्डचे माध्यमातून) कर्जसुध्दा मंजूर झाले आहे. त्यामुळे प्रकल्पाची उर्वरीत कामे जून

२०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यातून निवेदनातील गावांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महिला व बालविकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये कपात करण्यात आल्याबाबत

**(७२) * २६८२९ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बालविकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये सन २०१५-२०१६ च्या तुलनेत ६२ टक्के कपात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आयसीडीएस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचे प्रमाण ५० ते ६० टक्के असून अंगणवाडी सेविकांचे व मदतनीसांचे वेतन सहा महिने रखडले असतानाही या विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये कपात करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील वाढते कुपोषण रोखण्यासाठी शासनाने काय उपाययोजना आखली आहे तसेच उक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

महिला व बाल विकास विभागास सन २०१५-२०१६ मध्ये पुरवणी मागणीसह प्राप्त झालेला निधी व सन २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेली मूळ अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेता निधीमध्ये कपात दिसत असली तरी माहे डिसेंबर २०१६ पर्यंत पुरवणी मागण्यांद्वारे प्राप्त झालेल्या निधीसह विभागास पुरेसा निधी प्राप्त झाला आहे.

राज्यातील आयसीडीएस अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे काही प्रमाणात रिक्त असून अंगणवाडी सेविकांचे व मदतनीसांचे माहे जानेवारी २०१७ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(३) राज्यातील वाढते कुपोषण रोखण्यासाठी विभागाकडून अंगणवाड्यातील ०-६ वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना १) पुरक पोषण आहार २) आरोग्य तपासणी ३) संदर्भ सेवा ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण ५) लसीकरण ६) आहार व आरोग्य इत्यादी सेवा देण्यात येतात.

याशिवाय राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्रचना या योजनेंतर्गत २० जिल्हयातील ग्रामीण/आदिवासी व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी लाभार्थ्यांना नियमित आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पौष्टीक मुल्य असलेले अंडी/केळी इ. चा पुरवठा केला जातो. अंगणवाडीतील लाभार्थीकरिता ग्राम बाल विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणा-या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. तसेच या क्षेत्रातील गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्याकरिता आदिवासी विकास विभागाशी समन्वय साधून डॉ. ए.पी.जे. कलाम अमृत आहार योजना अंगणवाडीतून राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दिक्षाभूमी, चिंचोली (शांतीवन) व ड्रॅगन पॅलेस (नागपूर) येथील बुध्दीस्ट स्थळांचा विकास बुध्दीस्ट सर्किट म्हणून करण्याबाबत**

**(७३) * २७१५८ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २४४६१ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ऐतिहासिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौध्द धर्माच्या दिक्षेच्या कार्यक्रमामुळे जगभर प्रसिध्दी पावलेल्या दिक्षाभूमीला चिंचोली (शांतीवन) व ड्रॅगन पॅलेस कामठी या क्षेत्राचा बुध्दीस्ट सर्कीट म्हणून विकसित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बुध्दीस्ट सर्कीट विकसित करण्याकरीता किती निधीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, तसेच चिंचोली (शांतीवन) ते नागपूर असा मेट्रो रेल्वेचे जाळे टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच दिक्षाभूमी, चिंचोली (शांतीवन) व ड्रॅगन पॅलसचा विकास करुन तिन्ही बौध्द स्थळांचा ‘अ’ ग्रेड (दर्जा) देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत निधी मिळण्यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालयास सप्टेंबर, २०१६ मध्ये रूपये ९९.९९ कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे.

चिंचोली(शांतीवन) ते नागपूर असा मेट्रो रेल्वे विकसित करण्याचा निर्णय झालेला नाही.

(३) नागपूर येथील दिक्षाभूमी या स्थळास दिनांक ८/३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. ड्रॅगन पॅलेसला पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून चिंचोली(शांतीवन) व ड्रॅगन पॅलेसच्या विकासासाठी निधी मिळण्यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालयास प्रस्ताव सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनधिकृत, बेकायदेशीर खाजगी पाळणाघरे-बालगृहांवर कारवाई करणेबाबत

**(७४) * २७५४९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पुर्व उपनगरातील मानखुर्द येथील ‘द चिल्ड्रन्स एड्स सोसायटी’ या संस्थेच्या अखत्यारीतील मुंबईतील अन्य आठ बालगृहांबाबत चौकशी करण्यासाठी आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी नेमलेल्या आयुक्तालयातील अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात स्वयंसेवी संस्था वा घरगुती बालगृह-पाळणाघरे निर्माण झाली असून माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान खारघर (मुंबई) येथे एका पाळणाघर संचालिकेकडून मुलीवर अत्याचार होत असल्याचे निदर्शनास येऊन सदर घटनेचा मेसेज सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यानंतर कारवाई केली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही,

दि चिल्ड्रेन एड सोसायटी संचलित मतिमंद बालगृह मानखुर्द येथील प्रवेशितांच्या मृत्यूबाबत दिनांक २५/५/२०१६ रोजी मुंबई येथे विविध वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता आयुक्त (अपंग कल्याण), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमली होती व या चौकशी समितीने दिनांक ०५/१२/२०१६ रोजी शासनास अहवाल सादर केलेला आहे.
(२) होय.
(३) खारघर येथील पाळणाघर प्रकरणी पाळणाघराची संचालिका आणि आया यांचे विरुध्द भा.दं.वि. च्या कलम ३२५,३४ वाढीव कलम ३०७ व बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५, कलम ७५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(७५) * २९३१२ श्री.रविंद्र फाटक, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे धरणे-आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी महिला, सफाई कर्मचारी, आरोग्य सेवक यांच्या मागण्या मान्य न झाल्यास दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून पालघर जिल्हयात एकही अंगणवाडी चालू देणार नाही असा इशारा श्रमजीवी संघटनेने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

तथापि, श्रमजीवी कामगार संघटनेने अंगणवाडी सेविका, मदतनीस, सफाई कामगार, वाहन चालक, रोजगार हमी सेवक, इत्यादी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन दिनांक ११/०१/२०१७ रोजी पालघर जिल्हा परिषदेकडे सादर केलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जलसंपदा विभागाच्या कनिष्ठ अभियंता पदाच्या**
**भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(७६) * २७२३५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या कनिष्ठ अभियंता पदाच्या भरती प्रक्रियेत अनेक ठिकाणी गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती येथील कार्यकारी अभियंत्याने त्याच्या पुतणीला भ्रमणध्वनीवरुन सर्व उत्तरे सांगितल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच नाशिक येथील परिक्षा केंद्रावर वेळेमध्ये पोहचून सुध्दा सुमारे १५० विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक परिक्षेला बसण्यास विरोध केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २५ नोंव्हेबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास झालेल्या परीक्षेची मेरीट लिस्ट २८ नोंव्हेबर, २०१६ रोजी जाहीर होणे बंधनकारक असताना काही केंद्रावर ती जाहीर करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

दिनांक २५/११/२०१६ रोजी झालेल्या परिक्षेची मेरीट यादी मे.महाऑनलाईनच्या वेबसाईटवर दिनांक २८/११/२०१६ रोजी लावणे अपेक्षित होते. परंतु, परिक्षेतील प्रश्नांचे बाबतीत उमेदवारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण, कार्यपद्धतीनुसार केल्यानंतरच दिनांक ०७/१२/२०१६ रोजी मे.महाऑनलाईन लि.मुंबई यांचे वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) गावामध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून विकास कामे मंजूर करणेबाबत**

**(७७) * २६९१४ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत निवडलेल्या गावामध्ये, जिल्हा वार्षिक योजनेतील नाविन्यपूर्ण योजनेतून अभ्यासिका आणि यात्रास्थळ विकासासाठी असलेल्या अनुदानातून येथील ‘क’ वर्ग यात्रास्थळाला वाहनतळ करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील विकास कामांसाठी जिल्हा प्रशासनाने माहे जानेवारी, २०१७ पर्यंत प्रशासकीय मान्यता व अनुदान दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आमदार आदर्श ग्राम योजनेतील गावामधील विकास कामांना निधी वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून प्राप्त माहिती नुसार आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत लासलगाव ता.निफाड, जि.नाशिक या गावचा ग्रामविकास आराखडा जिल्हाधिकारी नाशिक यांना प्राप्त झाला असून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत अभ्यासिका व “क” वर्ग तिर्थक्षेत्र विकासासाठी जिल्हा परिषदांना अनुदान या योजनेंतर्गत यात्रास्थळाला वाहनतळ या कामाचा समावेश आहे. आराखड्यात नमुद तथा जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निकषात बसणा-या कामाना जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने प्राधान्याने मंजूरी देण्याची बाब विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**दहेगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथे रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना सुरु करण्याबाबत**

**(७८) * २८८८८ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहेगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथे रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना मागील वीस वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० वर्षापासून बंद असलेली योजना सुरु झाल्यास १८ गावातील सिंचन क्षेत्रासह ५० गावातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३ मे, २०१५ रोजी मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संबंधित विभागाने शासनाकडे प्रस्ताव दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेची समिती मार्फत संयुक्त पहाणी करुन योजना सुरु करण्यासाठी घटकनिहाय खर्चाचे अंदाजपत्रक करण्याचे आदेश देऊन सदर योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सदरची योजना सन १९९६-९७ पासून बंद आहे.
(२) रामकृष्ण गोदावरी ही खाजगी सहकारी उपसा जलसिंचन योजना असून सिंचनासाठी कार्यान्वित झाली होती.

या योजनेच्या लाभक्षेत्रात १४ गावे असून एकूण सिंचनक्षेत्र ४४०० हेक्टर आहे. या योजनेचे काम सन १९९४ मध्ये पूर्ण झाले. सन १९९४/९५ व सन १९९५/९६ असे एकूण दोनच वर्ष सदर योजना कार्यान्वित राहिली असून त्यानंतर व्याजासह कर्जाची परतफेड, विज देयके व पाणीपट्टी वेळेवर न भरल्याने सन १९९६/९७ पासून योजना बंद आहे.

सदर सहकारी योजना भविष्यात चालू झाल्यास नियोजित लाभक्षेत्रास सिंचनाचा फायदा मिळू शकेल.
(३) व (४) असा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

तथापि मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २५/१०/२०१६ रोजी विधानभवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीतील निर्देशानुसार दिनांक १३/०१/२०१७ रोजी या योजनेची संयुक्त पाहणी करण्यात आली असुन सदर योजना पुर्नकार्यान्वित करण्यासाठीच्या खर्चाचे अंदाजपत्रक व प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदूरबार व धुळे जिल्हयातील तापी नदीवरील तापी बुराई व सुलवाडे-जामफळ, किनोली या उपसा सिंचन योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(७९) * २९००३ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार व धुळे जिल्हयातील तापी नदीवरील तापी बुराई व सुलवाडे-जामफळ, किनोली या उपसा सिंचन योजनेचे काम मागील ३ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्हीही योजनेच्या कामाला गती देण्यासाठी निधीची तरतूद करुन कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही,

(२) सुलवाडे जामफळ उसिंयो-प्रकल्पास वर्ष २०१६-१७ मध्ये एकूण रुपये १५.५० कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी रुपये १.५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला असून योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात रासायनिक औषधांमुळे व तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे कॅन्सरचा प्रादुर्भाव वाढल्याबाबत**

**(८०) * २७१६३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात रासायनिक औषधे व तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे १८ हजार नागरिक कॅन्सरग्रस्त असल्याचे तसेच महिलांमध्ये स्तन व गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत कॅन्सरग्रस्तांचे प्रमाण सन २०१० ते २०१४ या काळात १२ टक्क्याने वाढले असून हे प्रमाण प्रत्येक ८ व्यक्तींच्या मागे एक असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाची दखल घेवून शासनाने नागरिकांमध्ये तंबाखू, गुटख्याचे सेवन कमी करण्यासाठी जनजागृती करुन मुंबईतील तसेच कोल्हापूरमधील वाढते कॅन्सरचे प्रमाण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

शिरोळ तालुक्यातील सर्व रुग्णालये मिळून १८० संशयित कॅन्सर रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील ५० रुग्ण कर्नाटक राज्यातील आहेत. उपरोक्त १८० रुग्णांपैकी शिरोळ तालुक्यातील ४५ संशयित रुग्ण आहेत. यातील ३७ रुग्ण मुख कर्करोग, ३ रुग्ण स्तनाचा कर्करोग व ५ रुग्ण गर्भाशय मुख कर्करोगाचे आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

टाटा रुग्णालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या मागील ३१ वर्षाच्या Cancer incidence rates या सांख्यिकीय अहवालानुसार कॅन्सरच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तंबाखूचे सेवन कमी करण्याकरिता राज्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम राबविला जात आहे. एनजीओंच्या मदतीने शाळा व शाळा परिसरात तंबाखू मुक्त अभियान राबविण्यात येत आहे. राज्यात तंबाखू मुक्तीसाठी २५ जिल्हा रुग्णालयात तंबाखू मुक्ति केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत. कर्करोग रुग्णांसाठी राष्ट्रीय असंसर्गजन्य नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कॅन्सर वॉरिअर हा प्रकल्प टाटा मेमोरिअल रुग्णालयाच्या सहाय्याने राज्यातील एकूण १९ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. कॅन्सर वॉरिअर या प्रकल्पांतर्गत एकूण २६७ रुग्णांवरती शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वृक्षसंवर्धन आणि वनरक्षण करणाऱ्या मजूरांना मजुरीची रोख रक्कम अदा करण्याबाबत

**(८१) * २८२८७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वृक्षसंवर्धन आणि वनरक्षण करणाऱ्या वन विभागातील मजूरांचे केंद्र शासनाच्या कॅशलेस व्यवस्थेमुळे नुकसान झाल्याने वन विभागाची गैरसोय झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून या मजूरांना मजूरीची रोख रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) वन विभागांतर्गत रोपवनाची कामे ठराविक वेळेत आणि हंगामात करणे बांधील आहे. परंतु मजूर काम करीत असलेल्या काही दुर्गम आणि खोल जंगल भागात पोस्ट ऑफीस/राष्ट्रीयकृत बँक/ATM नसल्यामुळे मजूरांना दैनंदिन खर्चासाठी रक्कम व प्रसंगी रेशन उपलब्ध करून

द्यावे लागते. तथापि, शासन पत्र क्र.एफडीएम-२०१६/ प्र.क्र.२३७/फ-२, दिनांक २१/१०/२०१६ अन्वये मजूरांचे वेतन संबंधित मजूराच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये जमा करूनच अदा करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. त्यानुसार, कार्यवाही करण्यात येत आहे. सबब, मजूरांची कॅशलेस व्यवस्थेमुळे कोणतीही गैरसोय झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर कामठी रोडवरील डॉ.आंबेडकर रूग्णालयाचा विस्तार जमिनीच्या वादामुळे प्रलंबित असल्याबाबत

**(८२) * २७०९४ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कामठी रोडवरील डॉ.आंबेडकर रूग्णालयाचा विस्तार जमिनीच्या वादामुळे प्रलंबित असल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयाचा विस्तार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१), (२) व (३) संस्थेच्या जमिनीसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कार्यवाही प्रलंबित आहे, हे खरे आहे.

-----------------

## हिरडपाडा (ता.जव्हार, जि.पालघर) येथील पर्यटन स्थळाची झालेली दूरवस्था

**(८३) * २७०८३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिरडपाडा (ता.जव्हार, जि.पालघर) हे पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता रूपये ५८ लाख निधीची तरतूद करूनही निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे पर्यटनस्थळाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिरडपाडा पर्यटन स्थळाची दूरवस्था झाल्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार हिरडपाडा पर्यटन स्थळावरील निकृष्ट दर्जाच्या बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून पर्यटन स्थळाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील ६४ धरणांवर खाजगीकरणातून ५०० मेगावॅट वीजेची निर्मिती करण्याचा जलसंपदा विभागाच्या प्रस्तावाबाबत

**(८४) * २७७२५ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील ६४ धरणांवर खाजगीकरणातून ५०० मेगावॅट वीजेची निर्मिती करण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या विचाराधीन असून तसा निर्णय घेण्यात आल्यास जलसंपदा विभागाला आर्थिक लाभ होणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच उक्त धरणावर वीज निर्मिती खाजगीकरणातून म्हणजे नेमक्या कोणत्या यंत्रणांकडून करण्यात येणार आहेत व त्यासाठी कोणते निकष, अटी, शर्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत,
(३) असल्यास, सदर वीजचे वितरण कशाप्रकारे करण्यात येणार आहे, जलसपंदा विभागास किती आर्थिक लाभ होणार व त्याचा विनियोग कशाप्रकारे करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
विदर्भातील २२ धरणांवर (एकूण ६४.४७० मेगावॅट) ३८ जलविद्‌युत प्रकल्पाव्दारे वीजनिर्मिती खाजगीकरणांतर्गत बांधा वापरा, हस्तांतरण धोरणांनुसार करण्याचे विचाराधीन आहे.

(२) २५ मेगावॅट क्षमतेपर्यंतचे जलविद्युत प्रकल्प खाजगी विकासकामार्फत करण्याचे धोरण दिनांक १५/०९/२००५ रोजी जाहिर केलेले आहे. या धोरणातील महत्वाचे निकष व अटी खालील प्रमाणे आहेत.

२.१) खाजगी विकसकांनी स्वत: शोधलेल्या प्रकल्पांसाठी प्रवर्तकांना सर्वेक्षण करण्यासाठी परवानगी (LOP) दिली जाते. तर शासनाने शोधलेले प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा पध्दतीने दिले जातात.

२.२) प्रवर्तकास जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीसाठी परवानगीपत्र दिल्यानंतर प्रवर्तकाने ३ महिन्यात जलविद्युत प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिकता व्यवहार्यता अहवाल शासनास मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे.

जलविद्युत प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यावर १ महिन्यात प्रर्वतकास देण्यात येते. त्यानंतर प्रर्वतकाने ८ दिवसात संबंधीत मुख्य अभियंता सोबत जलविद्युत प्रकल्पाचा प्रकल्प विकास करारनामा (HPDA) स्वाक्षांकित करणे आवश्यक आहे.त्यानंतर प्रवर्तकाने २४ महिन्यात प्रकल्पाची उभारणी करुन कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

(३) या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचे वितरणासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (MERC) च्या धोरणानुसार महावितरण कंपनी व खाजगी प्रवर्तक यांच्यात करारनामा करण्यात येतो.

जलसंपदा विभागास या प्रकल्पाव्दारे प्रचलित दरानुसार जमिनीचा भाडेपट्टा रुपये १००० प्रति मेगावॅट व पाण्याच्या स्वामित्व शुल्का पोटी रुपये ०.०५ प्रति युनिट इतका मोबदला मिळण्याची तरतूद आहे.

जलसंपदा विभागास मिळणारा मोबदला शासनाच्या महसूली खात्यामध्ये जमा केला जातो.

----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.